जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com


## परिवर्तन... कालचक्र...

परिवर्तन... परिवर्तन म्हणजे जीवन. परिवर्तन म्हणजे मृत्यु, सत्य, मिथ्या, प्रकाश, तिमीर, उत्थान, पतन, आशा, निराशा, शून्य, विराट, शांती अशांती... सगळं काही परिवर्तनच आहे.

प्रलय, भूकंप, आधीव्याधी, युद्ध हे परिवर्तनाचं निष्ठुर तांडव असतं तर, वसंताचं आगमन, इंद्रधनुचं सौंदर्य, जन्म, यौवनाचं वैभव, सौंदर्याचं मांगल्य, ज्ञानाचं पावित्र्य, चंदनाची शितलता, सुमनांची कोमलता, निरागस परिवर्तनाचा हर्षोल्हास असतो.

परिवर्तनाची पापणी लवते आणि सगळं घडतं. त्याचं पापणी उघडणं म्हणजे जीवन, आनंद, उत्थान तर त्याचं पापण्या मिटणं म्हणजे मृत्यू, दुःख, पतन.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



संपूर्ण विश्वावर विजय मिळवून अपराजित आहे हे परिवर्तन. निर्मिती व नष्टता म्हणजे परिवर्तनच.

पुरातन सुवर्णयुग आलं होतं ते परिवर्तनच होतं. वेद, रामायण, महाभारत इ. महान ग्रंथ निर्माण झाले ते त्या त्या काळातलं परिवर्तनच होतं.

आता हे सगळं संपुष्टात येऊन हे असं वाटा विखुरलेलं, गोंधळलेलं, असंख्य विकल्प देणारं युग आलेलं आहे हेही परिवर्तनच आहे. मी कालचक्र फक्त साक्षी या सर्व घडामोडींचा... परिवर्तनाचा...

# मारहाणीची तक्रार केल्याने पोलीसांकडून खोट्या गुन्ह्यात अडकविण्याच्या धमक्या

## कारवाई करण्यात आलेली नसल्याने २६ डिसेंबरपासून उपोषणाचा इशारा



विनाकारण मारहाण करणारे एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक व त्यांच्या सोबत असलेल्या तीन पोलीस कर्मचाऱ्यांवर अद्यापि कारवाई करण्यात आलेली नसल्याने रिपाईच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालया समोर आमरण उपोषण करण्याचा इशारा देणारे निवेदन देण्यात आले.

नगर - रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे युवक तालुकाध्यक्ष जयराम आंग्रे यांना विनाकारण मारहाण करणारे एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक व त्यांच्या सोबत असलेल्या तीन पोलीस कर्मचाऱ्यांवर अद्यापि कारवाई करण्यात आलेली नसल्याने २६ डिसेंबर पासून जिल्हाधिकारी कार्यालया समोर आमरण उपोषण करण्याचा इशारा रिपाईच्या वतीने देण्यात आला आहे. तर सदर पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात तक्रार केल्याने खोट्या गुन्ह्यात अडकविण्याच्या धमक्या सदर युवकास दिल्या जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

रिपाईचे युवक तालुकाध्यक्ष जयराम आंग्रे २० नोव्हेंबर रोजी सायंकाळी मतदान करण्यासाठी देहरे गावातील मतदान केंद्रावर गेले होते. त्या ठिकाणी मतदान करून बाहेर येत असताना एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक व त्यांच्या समवेत असलेल्या तीन सहकारी पोलीसांनी त्यांना विनाकारण बेदम मारहाण केली. मारहाणीनंतर त्यांना २१ नोव्हेंबरला जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

याप्रकरणी त्यांच्यावर कारवाई होण्यासाठी आंग्रे यांनी २७ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे तक्रार केलेली आहे. तक्रार केल्याचा राग येऊन सदर पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून खोट्या गुन्ह्यात अडकवून जेलमध्ये टाकण्याच्या धमक्या त्यांना दिल्या जात असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

मतदानाचा हक्क बजावण्यासाठी आलेल्या युवकास मारहाण करणारे व तक्रार केल्याचा राग धरुन खोट्या गुन्ह्यात अडकविण्याच्या धमक्या देणाऱ्या एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक व त्या तीन कर्मचारींवर कारवाई करण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी रिपाईचे जिल्हाध्यक्ष सुनिल साळवे, शहर जिल्हाध्यक्ष किरण दाभाडे, नगर तालुकाध्यक्ष अविनाश भोसले, युवक जिल्हाध्यक्ष विवेक भिंगारदिवे, शहर उपाध्यक्ष प्रतिक नरवडे, सोनू ठोंबे, योगेश त्रिभूवन, महिला जिल्हाध्यक्षा आरती बडेकर, मायाताई जाधव आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या शेजारून रस्त्यावरील वाहने गेल्याने पेविंग ब्लॉक खचले

## मार्केट यार्डच्या पुतळ्याशेजारी बॅरीकेट लावा अन्यथा भीमसैनिक आंदोलन करणार



डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या शेजारून रस्त्यावरील वाहने गेल्याने पेविंग ब्लॉक खचले आहेत.

नगर - अनेक वर्षापासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्याची मागणी करण्यात आली असून ही मागणी मान्य झाली व जुन्या पुतळ्याशेजारी नवीन पुतळा उभारण्यासाठी सुशोभीकरण करण्यात आले. सुशोभीकरण करण्याचे काम पूर्ण झाले असून देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा नवीन पुतळा बसवण्यात आला नसून जुना पुतळा आहे त्या ठिकाणीच ठेवण्यात आलेला आहे मात्र त्याला संरक्षण भिंत नसल्याने कोणतीही घटना घडू शकते. शेजारी लावण्यात आलेले पेविंग ब्लॉक वर दुपारच्या सुमारास वाहन गेली व पेविंग ब्लॉक खचून सुदैवाने पुतळ्यावर वाहन गेली नाही त्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे. अशी कोणतीही घटना घडू नये त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला बॅरीकेट लावण्यात यावे अशी मागणी रिपाई आंबेडकर पक्षाचे रोहित आव्हाड, बौद्धचार्य संजय कांबळे, भीमसैनिक जिवा कांबळे, आरपीआय आठवले गटाचे अविनाश भोसले यांनी मनपा आयुक्त यांची भेट घेऊन केली आहे. अन्यथा समस्त आंबेडकर समाज बांधव व भीमसैनिकांच्या वतीने आंदोलन करण्यात येणार असल्याचे सांगितले.

# जिल्ह्यात सध्या कडाक्याची थंडी आगामी काळातही लाट कायम राहण्याची शक्यता

## थंडीपासून बचावासाठी दक्षता घेण्याचे जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाचे आवाहन

नगर - जिल्ह्यात सध्या कडाक्याची थंडी जाणवत असून तापमान वारंवार १० अंश सेल्सिअसच्या खाली घसरत आहे. आगामी काळातही थंडीची लाट कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी थंडीपासून बचावासाठी आवश्यक ती काळजी घ्यावी, असे आवाहन प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी शाहूराज मोरे यांनी केले आहे.

थंडीच्या लाटेबाबत स्थानिक हवामान अंदाज रेडिओ, टीव्ही व वर्तमानपत्रांद्वारे नियमित तपासावा. नागरिकांनी स्वेटर, मफलर, कानटोपी, हातमोजे, पायमोजे तसेच चादर यांसारखे पुरेसे उबदार कपडे वापरावेत. शक्यतो थंड वाऱ्यात बाहेर जाणे टाळावे व शरीर कोरडे ठेवावे. शरीर ओले झाल्यास त्वरीत कपडे बदलून शरीरातील उष्णता टिकवावी. निरोगी अन्न, विशेषतः व्हिटॅमिन सीयुक्त फळे व भाज्यांचा आहारात समावेश करावा. शरीरातील उष्णता टिकवण्यासाठी गरम पेय किंवा द्रव्यांचे नियमित सेवन करावे.

लहान मुले, वृद्ध व्यक्ती यांची विशेष काळजी घ्यावी. थंडीत दीर्घकाळ राहिल्यास त्वचेवर निस्तेजपणा किंवा बधीरता जाणवू शकते. अशा लक्षणांकडे दुर्लक्ष न करता त्वरीत डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. थंडीमुळे थरकाप जाणवल्यास तातडीने उबदार ठिकाणी जावे. पशुधन आणि पाळीव प्राण्यांना सुरक्षित ठिकाणी हलवून त्यांचे थंडीपासून संरक्षण करावे.

आपत्कालीन परिस्थितीत प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे आणि आवश्यक असल्यास नजीकचे आरोग्य केंद्र, रुग्णालय किंवा १०८ टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही श्री. मोरे यांनी केले आहे.

## नशीम हमीद पटेल यांचे अल्पशा आजाराने निधन

नगर - येथील रहिवासी नशीम हमीद पटेल (वय ६८, रा.चाणक्य चौक, बुरुडगाव रोड) यांचे १९ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर सांडवे येथील कब्रस्तानमध्ये दफनविधी करण्यात आला.

त्यांच्या पश्चात पती, ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. उबेद, जुनेद, मोसीम पटेल यांच्या त्या मातोश्री होत. तसेच हमीद पटेल यांच्या पत्नी होत.

## लिलाबाई डोंगरवाल यांचे संथारा व्रतात निधन



नगर - गणंजय कॉलनी, ९ गावडेमळा, पाईपलाईन रोडवरील श्रीमती लिलाबाई धनराज डोंगरवाल (वय ८०) यांचे १९ डिसेंबर रोजी संथारा व्रतात निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. नवनीत डोंगरवाल व सुरेखा नहार, सौ.शकुंतला देसर्डा यांच्या त्या मातोश्री होत्या.

## इंदूबाई वाघ यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - येथील रहिवासी इंदूबाई अंबादास वाघ (वय ८०, रा.चिचोंडी पाटील) यांचे २० डिसेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्यावर चिचोंडी पाटील येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. राजेंद्र, संजय वाघ यांच्या त्या मातोश्री होत.

## आजेश छजलाने यांचे अल्प आजाराने निधन



नगर - येथील रहिवासी आजेश (पापा) सुरेश छजलाने (वय , रा.नेहरू कॉलनी, भिंगार) यांचे २० डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्यावर भिंगार येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, २ भाऊ, भावजया असा परिवार आहे.

## डॉ. लक्ष्मणसिंग ठाकुर यांचे अल्प आजाराने निधन



भिंगार - येथील रहिवासी डॉ. लक्ष्मणसिंग भारतसिंग ठाकुर (वय ६५, रा.भिंगार) यांचे १९ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. प्रितम परदेशी यांचे ते मामा होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अमित शाह यांच्या प्रतिकात्मक पुतळ्यास वंचित आघाडीच्यावतीने जोडे मारो आंदोलन

## राज्यसभेत बाबासाहेबांच्या नावावरुन केलेल्या वक्तव्याचा निषेध



अमित शाह यांच्या प्रतिकात्मक पुतळ्यास वंचित आघाडीच्यावतीने जोडे मारो आंदोलन करण्यात आले.

नगर - केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संविधानावरील चर्चेदरम्यान राज्यसभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावावरुन केलेल्या वक्तव्याचा शहरात वंचित बहुजन आघाडीच्या वतीने निषेध नोंदविण्यात आला. मार्केटयार्ड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन शाह यांच्या प्रतिकात्मक पुतळ्यास जोडे मारो आंदोलन करण्यात आले. यावेळी शाह व भाजप विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

या आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे, सल्लागार जे.डी. शिरसाठ, शहर महासचिव अमर निरभवणे, नगर तालुकाध्यक्ष मारुती पाटोळे, संजय शिंदे, जीवन कांबळे, प्रमोद सूर्यवंशी आदी सहभागी झाले होते.

योगेश साठे म्हणाले की, आंबेडकरांचे नाव घेणे फॅशन नसून, प्रत्येक भारतीयांची अस्मिता आहे. भाजपच्या विचारसरणीप्रमाणे शाह यांनी वक्तव्य केलेले आहे. त्यांना संविधान मान्य नसून, संविधानविरोधी कृत्य केंद्रात व राज्यात केले जात आहे. परभणी येथील घटना देखील याच विचारसरणीतून घडली आहे. बाबासाहेब हे सर्व बहुजनांचे दैवत असून, शाह यांनी केलेले वक्तव्याचा निषेध असल्याचे त्यांनी सांगितले.

# उपनगरातील प्रकाशपूर परिसरात भटक्या कुत्र्यांनी मांडला 'उच्छाद'

## तातडीने बंदोबस्त न केल्यास महापालिकेत ठिय्या आंदोलन करण्याचा नागरिकांचा इशारा

नगर - सावेडी उपनगरातील प्रकाशपूर या दाट लोकवस्ती असलेल्या भागात मागील काही दिवसांपासून भटक्या व काही पाळीव कुत्र्यांनी उच्छाद मांडला आहे. आतापर्यंत अनेकांना त्यांनी चावा घेतला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिक हैराण झाले असून, आबालवृद्धांच्या मनात त्या कुत्र्यांविषयी भीती निर्माण झाली आहे. यासंदर्भात महापालिकेकडे तक्रार अर्ज देऊनही त्याकडे संबंधित विभागाने दुर्लक्ष केले असल्याचा आरोप प्रकाशपूर को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

यासंदर्भात सोसायटीचे अध्यक्ष रविंद्र गायकवाड व सचिव विशाल मिसाळ यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी महापालिका आयुक्त यांना निवेदन दिले असून, त्यात म्हटले आहे की, भटके व पाळीव कुत्र्यांसंदर्भात नागरिकांनी केलेल्या तक्रार अर्जावर महापालिकेच्या संबंधित विभागाने कोणत्याही उपाययोजना न केल्याने कुत्र्यांनी चावा घेण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत. सद्यस्थितीत महापालिकेच्यावतीने परिसरात सिमेंट कॉँक्रिटचे रोड निर्माण करण्याचे काम चालू आहे. त्यामुळे एक रस्ता सोडून बाकी सर्व रस्ते बंद आहेत. अशावेळी प्रकाशपूरमधून बाहेर पडण्याच्या मार्गावर भटक्या कुत्र्यांचे टोळके वावरत असतात. ते येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना चावा घेतात. त्यात लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक यांचाही मोठ्या प्रमाणात समावेश आहे. याबाबत महापालिकेकडून दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.

या भटक्या कुत्र्यांचा त्वरित बंदोबस्त करण्यात यावा अन्यथा महापालिकेत ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा सोसायटीतील नागरिकांनी दिला आहे.

# रहदारीस अडथळा करणाऱ्या हातगाडी चालकांवर कारवाई

नगर - रस्त्यावरील रहदारीस अडथळा निर्माण होवुन एखाद्याच्या जिवास धोका होईल अशा रितीने हातगाडी लावणाऱ्या दोघांविरुद्ध तोफखाना पोलिसांनी गुरुवारी (दि.१९) रात्री ८.३० च्या सुमारास कारवाई केली.

याबाबतची माहिती अशी की तोफखाना पोलीस पथक तोफखाना पोलीस ठाणे हद्दीत नाकाबंदी ड्युटी करीत असता दिल्लीगेट रोडवर चौपाटी कारंजा चौकात एक नाष्टा सेंन्टर नावाची हातगाडी ही रस्त्याचे मधोमध लावलेली मिळून आली. गितांजली बंडु कुल्लाळ (वय ३४, रा चौपाटी कारंजा चितळे रोड) यांची ही हातगाडी असल्याचे समोर आले. ती पोलिसांनी ताब्यात घेतली.

दुसऱ्या कारवाईत दिल्ली गेट येथील भारत गॅस समोर एक कुशन ची हातगाडी ही पश्चिमेकडे तोंड करुन रस्त्याचे मधोमध रहदारीस व वाहतुकीस अडथळा होऊन अपघात होईल व एखाद्याचे जिवास धोका निर्माण होईल अशा रितीने उभी केलेली मिळुन आली. सदरची हातगाडी करण नंदु चव्हाण (वय २८, रा.सावेडी गाव)यांच्या मालकीची असल्याचे समोर आले. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात पो.कॉ.सावळेराम क्षिरसागर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोघाविरुध्द भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम २८५ प्रमाणे दोन वेगवेगळ्या गुन्ह्यांची नोंद करण्यात आली.

# डीएसपी चौकात अनधिकृत फ्लेक्स बोर्ड लावणाऱ्यावर गुन्हा दाखल

## महापालिकेची कारवाई, प्रभाग अधिकाऱ्यांनी दिली पोलिसांत फिर्याद

नगर - शहरातील डीएसपी चौकात अनधिकृत फ्लेक्सबोर्ड लावणाऱ्यावर महापालिकेच्या वतीने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महापालिकेचे प्रभाग अधिकारी शाम तुकाराम गोडळकर यांनी याबाबत गुरुवारी (दि.१९) दुपारी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

यामध्ये त्यांनी म्हंटले आहे की, आपण गुरुवारी सकाळी कार्यालयात असताना वरिष्ठ अधिकाऱ्यांचा फोन आला की, डीएसपी चौकात अनधिकृत फ्लेक्सबोर्ड लावण्यात आलेला असून त्यावर कारवाई करा. या सूचना मिळाल्यावर प्रभाग अधिकारी गोडळकर हे कार्यालयातील शंकर गवळी, देविदास बिज्जा, आतिफ शेख यांच्या सह घटनास्थळी गेले असता डीएसपी चौकाजवळ फिरोदिया यांच्या निवासाच्या भिंतीलगत नईम शेख यांची रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, अल्पसंख्यांक विभाग जिल्हा कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन. असा फलक अनधिकृतपणे लावण्यात आल्याचे दिसून आले.

या पथकाने त्या फलकाचा पंचनामा करून तो ताब्यात घेतला. त्यानंतर प्रभाग अधिकारी गोडळकर यांनी मुंबई उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिकेच्या अनुषंगाने विना परवाना फ्लेक्स बोर्ड लावणाऱ्या अज्ञात व्यक्ती विरुद्ध फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपीकरणास प्रतिबंध अधिनियम १९९५ चे कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### हिवाळ्यातही शरीराला ठेवा हायड्रेड

हिवाळ्यात आपल्याला तहान लागत नाही परंतु याचा अर्थ असा नाही की आपण हायड्रेशनमधून विश्रांती घ्यावी. या ऋतूतही तुमच्या शरीराला पाण्याची तेवढीच गरज असते. हिवाळ्यात आपण पाणी कमी करतो त्यामुळे अनेक प्रकारच्या समस्या उद्भवतात.यामुळे थकवा आणि खराब मूड देखील होऊ शकतो. हिवाळ्यातही वेळोवेळी पाणी पीत राहा. याशिवाय काही हायड्रेटिंग फळे खाऊनही तुम्ही तुमचे शरीर हायड्रेट ठेवू शकता.

## पाककला

### बाजरीची खिचडी

**साहित्य :** १/२ कप बाजरी, १ मूठ तांदूळ, १ मूठ मूग डाळ, हिंग, तूप, जिरे, अर्धा चमचा हळद, चवीनुसार मीठ

**कृती :** सर्वात आधी बाजरी स्वच्छ करून हलकीशी बारीक करून घ्यावी. आता बाजरी ५-६ तास पाण्यात भिजत ठेवावी. तसेच पाणी काढून टाकल्यानंतर मिक्सरमध्ये एकदाच फिरवा. आता कुकरमध्ये बाजरी, मूग डाळ, तांदूळ आणि मीठ आणि हळद घालून गॅसवर ठेवावे. कुकरमध्ये दोन वाट्या पाणी टाकून खिचडी ३-४ शिट्ट्या घेऊन शिजवून घ्या. कढईत तूप गरम करून खिचडीसाठी फोडणी तयार करावी. तूप गरम झाल्यावर त्यात हिंग व जिरे घालावे. आता त्यात बारीक चिरलेली हिरवी मिरची घालावी. आता तयार केलेली फोडणी खिचडीवर घालावी.

## वास्तू

### हत्तीच्या मुर्तीचे महत्त्व

वास्तुशास्त्रात हत्तीची पूजा ज्ञान, शक्ती आणि स्थिरतेचे प्रतीक म्हणून केली जाते. असे मानले जाते की घरात त्याची उपस्थिती नशीब आकर्षित करते आणि अडथळे दूर करते. यामुळे घरातील एकूण वातावरणात सुसंवाद वाढण्यास मदत होते. हत्तीचे गुण वास्तुच्या तत्त्वांनुसार मानले जातात, जे जिवंत वातावरणात संतुलन आणि सकारात्मक ऊर्जा प्रवाहावर जोर देतात.

## सल्ला

वास्तूनुसार हत्तीची मूर्ती ठेवण्यासाठी दक्षिण-पश्चिम दिशा टाळावी.

## सौंदर्य

गालावर नॅचरल चमक येण्यासाठी चीकबोन्सला हायलाइट करा. सध्या न्यूड मेकअप लूकसाठी आपल्या त्वचेला सूट होईल अशा नॅचरल शेडची निवड करा. न्यूड शेड्स लावण्याआधी लाईट बेस लावा आणि हलक्या हातांनी लूज पावडर लावा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. २१ डिसेंबर २०२४

**उत्तरायणारंभ, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, मार्गशीर्ष कृष्णपक्ष, पूर्वा ३०।१४, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०६ वा. १७ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** मैदानी खेळात सहभागी व्हाल. तंदुरुस्त राहाल.

**वृषभ :** स्पर्धात्मक परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जाल.

**मिथुन :** जोडीदाराला समजावून घ्याल. तुमचे व्यक्तिमत्त्व आज बहरेल.

**कर्क :** मानसिक ताण शक्य. कठोर बोलणे महागात पडेल.

**सिंह :** आर्थिक परिस्थिती समाधानकारक राहील. स्थावर मालमत्तेत गुंतवणूक कराल. मागील उधारी वसुल होईल.

**कन्या :** आर्थिक गुंतवणुकीतून योग्य तो मोबदला मिळेल. नात्यामध्ये कटुता येईल.

**तूळ :** वाहने व उपकरणे जपून वापरावीत.

**वृश्चिक :** सहकाऱ्यांशी आपुलकीने वागाल. अति खाण्याने त्रास होईल.

**धनु :** शारीरिक व्यायाम अथवा योगाचे महत्त्व लक्षात घ्याल.

**मकर :** सकारात्मक ऊर्जेने कार्यरत राहाल. आर्थिक स्थितीमध्ये बदल घडतील.

**कुंभ :** अनावश्यक गोष्टींचा विचार करू नका. मानसिक बळ वाढेल.

**मीन :** कर्जाऊ रक्कम देणे टाळावे. व्यवसायात भागीदारी तूर्तास नको.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

एक भिकारी देवाला म्हणतो, हे देवा मला खाण्यासाठी असं काहीतरी दे जे, खाल्ल्यावरसुद्धा संपले नाही पाहिजे देव - हे घे पूर्ण एक चिंगम

## जागतिक आश्चर्ये

*ख्रिस्तपूर्व २२६ वर्षांपूर्वी ऱ्होडस् याचे स्मृतीस्थानक ३० मीटर इतक्या उंचीपर्यंत बांधलेले होते. त्याचा पुतळा हा त्याच पिरियडमध्ये आलेल्या भूकंपामुळे नष्ट झाला. तो जमिनीवर कोसळला. हा पुतळा जरी पूर्णपणे नष्ट झाला होता तरी त्याही स्थितीत तो आकर्षक दिसत होता व तो पाहण्यासाठी लाखो लोक स्मृतीस्थळ ठिकाणी भेट देतात.*

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७०७५ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ■ | ५ | ६ |
| ७ | | ■ | ८ | | ९ | | |
| १० | | ११ | ■ | १२ | | ■ | |
| ■ | ■ | १३ | | ■ | १४ | १५ | ■ |
| १६ | १७ | | ■ | १८ | | | १९ |
| २० | | ■ | २१ | | ■ | २२ | |
| ■ | २३ | २४ | ■ | २५ | २६ | | ■ |
| २७ | | | ■ | २८ | | | ■ |

**आडवे शब्द :** १) जिल्ह्याचे ठिकाण असलेले मराठवाड्यातील एक शहर ५) जनावर वगैरे ज्याला बांधतात ती जमिनीत मारलेली खुंटी ७) हात; हस्त; सारा; महसूल ८) दणदण असा मोठा व एकसारखा होणारा आवाज १०) अंगावरून वारे जाणे; पक्षघात; अर्धांगवायू १२) वेळ; समय; मृत्यू १३) थर; पापुद्रा; दर्जा १४) शिजलेला तांदूळ १६) मुळीच नसणे; वानवा १८) लढाऊ जहाजांचा तांडा २०) प्रामाणिक; सावकार २१) आच; उष्णता; ऊब २२) वाईट सवय; खोड २३) गोळा झालेले; आय २५) 'महाराष्ट्र साहित्य परिषद'चे संक्षिप्त रूप २७) डोळा ; नेत्र; चक्षू २८) तारका; चांदणी

**उभे शब्द :-** १) उलगडा; खुलासा २) आठवण राहावी म्हणून केलेली योजना ३) काढून टाकलेला; आऊट ४) ठोसा; गडबड; दंगा; रट्टा ५) डोलीसारखे एक वाहन ६) परिवार; कुटुंब ९) सैन्य; फौज; सेना; लष्कर ११) वस्तुस्थिती, सत्यस्थिती १५) गरम मसाल्यातील एक पदार्थ १६) अशा प्रकारचा; असला १७) भावाची पत्नी १८) येणे १९) रममाण; मग्न; लीन २४) गळ्याची मागची बाजू; आदर २६) पाहणारा; पाहणाऱ्याने दिलेली जमीन

### शब्दगंध क्र. ७०७४ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | मा | प | ■ | प | रि | च | य |
| मि | न | त | वा | री | ■ | र | म |
| त | ■ | दा | र | ■ | फ | ■ | न |
| ■ | गो | र | स | ■ | ट | प्पा | ■ |
| पा | पा | ■ | दा | मो | का | ■ | प |
| ग | ळ | स | र | ■ | ■ | झे | ल |
| डी | ■ | मी | ■ | वा | स | ला | त |
| ■ | क | प | डा | ळ | ता | ■ | ड |

### फिल्मीचक्कर क्र. ११६८ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सौ | सा | ल | प | ह | ले | मु | झे |
| त | ■ | गा | ■ | सी | ■ | का | ■ |
| न | य | न | ■ | ना | ■ | ब | न |
| ■ | की | ■ | हे | मा | ■ | ला | या |
| ज | न | ता | ■ | न | ई | ■ | ■ |
| ज | ■ | ल | ता | ■ | क | स | म |
| बा | जी | ■ | क | ■ | दि | ■ | द |
| त | ■ | सं | त | ■ | न | ज | र |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** प्रत्येक प्रश्नाचे सर्वात चांगले उत्तर म्हणजे शांत राहणे.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### विमानात शौचालयातील मलमूत्र कुठे जातं? तुम्हाला माहीत आहे का?

फ्लाइटमध्ये सर्व प्रकारच्या सामान्य सुविधा उपलब्ध आहेत. त्यात स्वच्छतागृह सुविधांचाही समावेश आहे. विमानाने कधीही प्रवास न केलेल्या लोकांच्या मनात अनेकदा प्रश्न पडतो की विमानात टॉयलेटमध्ये गेल्यावर मानवी मलमूत्र जातं तरी कुठे? रेल्वेप्रमाणे ही घाण वरून थेट जमिनीवर पडेल, असेही अनेकांना वाटते. विमानात एक अतिशय लहान वॉशरूम आहे, ज्यामध्ये मानवी विष्ठा आणि मूत्र साठवण्यासाठी टाकी आहे. आता तंत्रज्ञान खूप प्रगत झाले आहे, त्यामुळे फ्लाइटमध्येही व्हॅक्यूम टॉयलेटची सुविधा उपलब्ध आहे. फ्लशमध्ये फ्लश करण्यासाठी पाण्याची गरज नाही. जेव्हा तुम्ही फ्लश बटण दाबता, तेव्हा टॉयलेट बाऊलच्या तळाशी एक व्हॉल्व्ह उघडते, त्यास खाली असलेल्या पाईपशी जोडते. तो पाईप कचरा टाकीला जोडलेला आहे. व्हॉल्व्ह उघडल्याने पाईपमध्ये व्हॅक्यूम तयार होतो जो टॉयलेटमधील सामग्री शोषून घेतो. ही प्रणाली व्हॅक्यूम क्लिनरसारखी आहे. बटण दाबताच ते व्हॉल्व्ह उघडते सक्शनने जुडलेल्या टाकीत खेचले जाते. व्हॅक्यूम प्रणालीद्वारे, सर्व घाण थेट टाकीमध्ये साठते. साधारणपणे या टाकीची क्षमता २०० लिटरपर्यंत असते. हे फ्लाइट ते फ्लाइट बदलू शकते.अर्थातच टॉयलेट फ्लश पंपद्वारे चालवले जाते, ज्यामुळे टाकीमध्ये व्हॅक्यूम तयार होतो. जसजसे विमान हवेत झेपावते आणि टाकीमध्ये विभेदक दाब तयार होतो, तेव्हा नैसर्गिकरित्या व्हॅक्यूम तयार होतो आणि पंप बंद होतो. टॉयलेट शीटमध्ये टेप्लॉनचा थर असतो. त्याला काहीही चिकटत नाही. अशा स्थितीत हवेच्या दाबामुळे ते पूर्णपणे स्वच्छ होतात. व्हॉल्व्ह उघडताच, हवेची जोरदार गर्दी सर्वकाही साफ करते. विमान कंपन्या त्यांना विमानात किती शौचालये हवी आहेत आणि कुठे हवी आहेत हे निवडतात.

आता या टाक्या कशा स्वच्छ केल्या जातात असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. वास्तविक विमान उतरताच त्याची साफसफाई सुरू होते. हे काम शौचालय कर्मचारी करतात. शौचालयाची टाकी फ्लाइटच्या टॉयलेट टाकीशी पाईपद्वारे जोडलेली असते. बटन चालू करताच या टाकीतून सर्व घाण निघून जाते.

### राम सेतूमध्ये खारुताईचे योगदान

माता सीतेच्या अपहरणानंतर भगवान रामाला लंकेत पोहोचता यावे म्हणून, त्यांची वानर सेना जंगलाला लंकेशी जोडण्यासाठी समुद्रावर पूल बांधण्यात व्यस्त होते. तेव्हा पूल बांधण्यासाठी दगडांवर भगवान श्री रामाचे नाव लिहून संपूर्ण सैन्य समुद्रात दगड फेकते होते. त्यावर भगवान रामाचे नाव लिहिल्यामुळे दगड समुद्रात बुडण्याऐवजी तरंगू लागले. हे सर्व पाहून सर्व माकडे खूप आनंदी झाले. त्यावेळी तिथे एक खारुताई होती, जी तोंडातून खडे उचलून नदीत फेकत होती. एक माकड तिला असे करतांना पाहत होते.

काही वेळाने माकड खारुताईची चेष्टा करते. माकड म्हणतो, ''अरे! खारुताई, तू खूप लहान आहे, समुद्रापासून दूर राहा. तू या दगडाखाली येऊन जाशील.''

हे ऐकून इतर माकडेही खारुताईची चेष्टा करू लागतात. हे सर्व ऐकून खारुताईला खूप दु:खी होते. खारुताईची नजर प्रभू रामावर पडताच ती रडत रडत भगवान राम जवळ येते.

दुखी खारुताई श्रीरामाकडे सर्व माकडांची तक्रार करते. मग भगवान राम उभे राहतात आणि माकड सैन्याला दाखवतात की खारुताईने फेकलेले खडे आणि छोटे दगड मोठ्या दगडांना एकमेकांशी कसे जोडण्याचे काम करत आहे. भगवान राम म्हणतात, ''जर खारुताईने हे खडे फेकले नसते, तर तुम्ही फेकलेले सर्व दगड इकडे तिकडे विखुरले असते. हे खारुताईने फेकलेले खडे आहे, जे त्यांना एकत्र धरून आहे.'' पूल बांधण्यात खारुताईचे योगदान हे माकड सदस्यांइतकेच अमूल्य आहे. हे सर्व सांगून, प्रभू राम प्रेमाने आपल्या हातांनी खारुताईला उचलतात. मग, खारुताईच्या कामाचे कौतुक करून, श्री राम तिच्या पाठीला प्रेमाने हात लावू लागतात. देवाचे हात लागताच, खारुताईच्या लहान शरीरावर त्याच्या बोटांचे ठसे तयार होतात. तेव्हापासून असे मानले जाते की खारुताईंच्या शरीरावर असलेले पांढरे पट्टे दुसरे तिसरे काहीही नसून बोटांच्या ठशांच्या रूपात रामाचा आशीर्वाद आहे.

**तात्पर्य :** इतरांच्या कामाची कधीही चेष्ट करू नये.

## रहमते दर्शन (भाग - १)



वे मुझसे बहुत प्यार करते थे। मैं जब भी उनके निवास पर जाता, माता जी मेरे लिए चाय पकौड़े आदि बनातीं। कभी-कभी वहाँ महाराज कृपालसिंह जी भी आ जाते और मुझे उनके भी दर्शनों का लाभ मिल जाता था । ये क्रम ५-६ साल तक चलता रहा। फिर मेरा स्थानांतरण ईस्टर्न कोर्ट में हो गया।

महाराज कृपालसिंह जी के चोला छोड़ने के उपरांत आप उनके उत्तराधिकारी बने और गुरु रूप में कार्य भार सँभाला। इतनी नज़दीकी होने के कारण मुझे इस बात पर विश्वास नहीं होता था। महाराज जी के ज्योति जोत समाने के बाद आपको इतना सदमा लगा कि आप बीमार हो गये और आपका रंग काला हो गया। एक दिन मैं एक सत्संगी बहन, माता वीरां के संग आपसे मिलने गया तो आपकी हालत देखकर दंग रह गया। आप बहुत दुर्बल हो गये थे। आपने पहले की तरह ही मुझे चाय पिलाई। घर वापिस आकर मैं भजन पर बैठ गया तो भजन में मैंने देखा कि हज़ारों सत्संगी चार-चार की कतारों में जा रहे हैं और हुज़ूर बाबा सावनसिंह जी महाराज एक तरफ हाथों में फूलों का हार लिए परेड का निरीक्षण कर रहे हैं। अचानक संत दर्शनसिंह जी हुज़ूर की ओर सिर उठाकर देखते हैं तो हुज़ूर वह हार उनकी तरफ फेंकते हैं, जो सीधा उनके गले में ही जा कि गुरु गद्दी के पड़ता है। मुझे यह देखकर अब पक्का यकीन हो गया सही अधिकारी यही हैं।

### प्रस्तावना

अपनी १५ साल की रूहानी शहंशाही के दौरान आपने बहुत कार्य किया और लाखों जीवों को नाम दान की बख्शिश देकर धुरधाम पहुँचने में उनका मार्ग प्रशस्त किया। मुझे अभी भी वे उतना ही प्यार करते थे। यदि मेरे घर का कोई सदस्य उनके पास पहुँचता तो वे फ़ौरन पहचान लेते। मेरा हाल-चाल पूछते और कहते, 'मेरी नमस्ते गुलाटी साहब को दे देना। उनमें नम्रता कूट-कूट कर भरी थी। सेहत ख़राब होने के कारण वे बाहर दौरों पर कम जाते थे, मगर फिर भी उन्होंने चार विदेशी दौरे किये।

महाराज कृपालसिंह जी नाम देने से पहले हर जीव से पूछते थे कि आपने सत्संग सुने हैं या नहीं। पूरी तसल्ली होने के बाद ही बड़ी मुश्किल से नाम मिलता था। मगर संत दर्शनसिंह जी ने इतनी दया मेहर की वर्षा की कि जो भी उनके चरणों में आया, नामदान की भरपूर दौलत लेकर ही उनके दर से गया। वे वास्तव में दयाल पुरुष थे ।

कभी-कभी वे मुझसे पूछते, तबीयत ज्यादा ख़राब है? मेरे हाँ कहने पर वे इतनी दया-मेहर करते कि अगले ही दिन मैं भला-चंगा हो जाता। १९८५ में मैं मानसिक रूप से पीड़ित था। परन्तु आपकी दया - मेहर से मैंने अपनी नौकरी भी पूरी की और आपकी ही बख्शिश से मेरे बच्चे भी बहुत लायक निकले जो कि आज बहुत अच्छे-अच्छे पदों पर हैं। यह बात ध्यान देने योग्य है कि मेरे सब बच्चे सरकारी स्कूलों में ही पढ़ते थे। उन्होंने मुझे निहायत ग़रीबी से निकाल कर बादशाह बना दिया । उनकी रहमतों को पूरा बखान करने के लिए कई उम्रे भी लगा दूँ, तो कम हैं।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

सिर्फ अच्छी पुस्तकें पढ़ें, धार्मिक साधना करें या आपने परिवार के कार्य करें। सप्ताह में एक दिन का आराम और दो रातो की भरपूर नींद चाहिए, जिस में कोई व्यावसायिक काम न हो। एक रात की नींद काफी नहीं होती। ३६ घंटे का आराम आप की शारीरिक और मानसिक बैटरी को रिचार्ज कर देगा। यह आराम आप के जीवन में अद्भुत नतीजे लायेगा। कई बार ऐसा होता है कि आराम से लौटने के बाद ज्यादा थक जाते हैं। ऐसा इसलिए हुआ कि आपने आराम में लिए भी मन को काम में उलझाए रखा। मन को काम से रोकने अनुशासन की जरूरत होती है, नहीं तो मनपसंद काम में हम लम्बे समय तक लगे रहते हैं। आप को अपने लम्बे अवकाश या ब्रेक के दौरान ही अच्छे आडिया आते हैं। कई लोग घर जल्दी आ जाते हैं परंतु टी.वी. के आगे ६-७ घंटे बैठे रहते हैं और बहुत देर से सोते हैं तथा सुबह उठते ही फिर टी.वी. लगा लेते हैं। इस से समय नष्ट होता है। अगर काम करने को मन नहीं करता, काम में रस नहीं आता, सदा थकावट बनीं रहती है तो इसका सीधा सा अर्थ है, आप नींद पूरी नहीं ले रहे हैं। ऐसी दशा में ८ घंटे की नींद लेनी चाहिए। यदि सप्ताह की दिमागी थकान हावी हो जाए तो शारीरिक श्रम करना चाहिए। भावनात्मक उथल-पुथल हो तो ज्यादा नींद लें। सैर करें, शरीर को थका दें, रात को अच्छी नींद आएगी।

### अंतरीक बल

हमारे दिमाग में अखुट ज्ञान का खजाना भरा हुआ है। हम किसी भी व्यक्ति को बदल सकते हैं। प्रत्येक व्यक्ति निरोगी बन सकता है और दूसरों को रोगो से मुक्ति दिला सकता है। हरेक व्यक्ति धनवान बन सकता है। हम एक स्थान पर रहते हुए पूरे विश्व को बदल सकते हैं। एक साधारण आदमी भी रिद्धि और सिद्धि प्राप्त कर सकता है। हम विश्व के किसी भी व्यक्ति को टी. वी. की तरह देख और सुन सकते हैं। हम भगवान से ऐसे बाते कर सकते हैं जैसे मनुष्यों से करते हैं। हम शक्तिशाली अस्त्र शस्त्र बना सकते हैं। हम हवा में उड़ सकते

। हम जो चाहे प्राप्त कर सकते हैं। परंतु यह ज्ञान हमारे दिमाग में बहुत गहराई में पड़ा है। वह ज्ञान हमें भूल गया है। इस ज्ञान को जागृत करने के लिए बहुत कठिनाइयों से भरी साधनायें वर्णित हैं। अगर उस ज्ञान को निकाल सकें तो हम समाज को मनचाही दिशा दें सकते हैं। विश्व का प्रत्येक व्यक्ति इस ज्ञान को अर्जित कर सकता हैं। सिर्फ उस विधि और सिद्धांतों को समझना है। अभी तक हम पास्ट की नकारात्मक बातें ज्यादा याद करते हैं, इसलिए हमारे जीवन में नकारात्मक बातें ही आती रहती हैं। अगर हम भूतकाल की बुरी चीजो को याद न करके सिर्फ वही चीजें याद करें जिन से अपना और दूसरों का कल्याण होता है, तब हम गहन ज्ञान को दिमाग के गहरे तलों से निकाल सकेंगे। सिर्फ हमें देखी और सुनी हुई अच्छी चीजें याद रखनी हैं। हम अक्सर भूल जाते हैं। आपने ५ मिनट पहले घर की चाबिया कहीं रखी थी परंतु अभी याद नहीं आ रही कि कहां रखी थी। जो मुरली हमने सुबह पढ़ी थी वह शाम तक भूल जाती है। जब कोई पारिस्थिति आती हैं तो हम ज्ञान की पोइंट भूल जाते हैं।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

१) २ कप पाण्यात सात ते आठ तुळशीची पाने, ७-८ गवतीचहाचे कापलेले तुकडे, १ इंच आल्याचा तुकडा व थोडा गूळ घालून १ कप होईपर्यंत आटवावे व गाळून गरम गरम प्यावे.

२) मधातून सीतोपलादी चूर्णाचे चाटण करावे.

३) अडुळशाचा काढा प्यावा. एवढे करूनही बरे न वाटल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार करावा.

७) श्वास : दम लागणे, गर्भावस्थेच्या शेवटच्या काळामध्ये गर्भाशयाची उंची वाढल्याने त्याचा दाब फुफ्फुसावर पडतो व त्यामुळे दम लागतो. तसेच शरीरामध्ये हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी असेल, गर्भावस्थेमध्ये रक्तदाब वाढलेला असेल, तर गर्भवती स्त्रीला दम लागतो. अशा वेळेस गर्भवती स्त्रीला ज्या स्थितीमध्ये आराम वाटत असेल अशा सुयोग्य स्थितीत झोपवावे. शक्यतो वामंगासनामध्ये झोपावे. जर गर्भवतीला दम्याचा (तमक श्वास) त्रास तर श्वास कुठार रसवटी दोन-दोन सकाळी व संध्याकाळी घ्यावी. त्याच बरोबर मादी चूर्ण एक-एक चमचा मधातून घ्यावे. तसेच कोमट पाणी पिण्यास द्यावे व छातीवर सकाळी व रात्री कोमट तीळ तेल चोळण्यास द्यावे. पत्रमार्गामध्ये जंतूसंसर्गः पहिल्या तीन महिन्यात गर्भाशयाचा आकार वाढल्यामुळे याचा मूत्राशयावर ताण पडतो, तर शेवटच्या तीन महिन्यात बाळाचे डोके कटी भागात उत्तरल्यामुळे मूत्राशयावर दाब पडतो. अशा वेळी वारंवार लघवी लागणे हे नैसर्गिकच आहेः परंत त्या बरोबर लघवीला जळजळ होणे, ताप येऊन थंडी वाजणे ही लक्षणे असतील, तर यावर उपचार करणे जरुरीचे असते. मूत्रमार्गाचा जंतुसंसर्ग होऊ नये म्हणून गर्भवती स्त्रीने योनीभाग रोज स्वच्छ धुवावा. दिवसभरात वारंवार पाणी प्यावे. आयुर्वेदिक औषधी उपाययोजना : चंद्रप्रभावटी सकाळ-संध्याकाळ २-२ घ्याव्यात. तसेच योनीभाग त्रिफळाच्या काढ्याने रोज धुवावा. गोक्षुर, पुनर्नवा या द्रव्यांचा काढा करून प्यावा.

### गर्भावस्थेतील तपासण्या व लसीकरण

९) दातांची निगा : गर्भावस्थेमध्ये 'व्हिटॅमिन सी' च्या कमतरतेमुळे गर्भावस्थेत बऱ्याच वेळेला हिरड्यांमधून रक्त येताना आढळते. दातांचे आरोग्य चांगले राहावे; म्हणून सकाळसंध्याकाळ दोन वेळेला दात साफ करावेत व व्हिटॅमिन सी ची कमतरता भरून येण्यासाठी संत्री, मोसंबी, आवळा ही फळे खावीत.

१०) सौंदर्याची काळजी : गर्भावस्थेतील हार्मोन्सच्या बदलामुळे चेहऱ्यावर काळे डाग येणे, मरुम येणे तसेच केस गळणे, केसांमध्ये कोंडा होणे हे आजार गर्भवतींमध्ये दिसतात. याकरीता हर्बल, आयुर्वेदिक उपचार करावेत.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# जीवनात ध्येय प्राप्तीसाठी सातत्य राखावे

## महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांचे प्रतिपादन, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या स्नेहसंमेलनात भारतीय संस्कृती व परंपरेचे दर्शन





अ.ए.सो. च्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडले. स्नेहसंमेलनात भारतीय संस्कृती व परंपरेचे दर्शन झाले.

नगर – जीवनात ध्येय प्राप्तीसाठी सातत्य राखावे. कोणत्याही परिस्थितीत गाफील राहू नये. जीवनातील ध्येय निश्चित करा व बेभान होवून ध्येयप्राप्त करा. जीवन जगण्यासाठी शिक्षणाबरोबर अवांतर गोष्टीही महत्त्वाच्या असतात. विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्येही सहभाग घेतला पाहिजे. विविध क्षेत्रांमध्ये निपुणता बाळगण्यासाठी स्पर्धा आवश्यक असतात. जीवन कसे जगावे हे खेळ शिकवतो. सोशल मीडियामुळे मुलांच्या संस्कारावर आघात होत आहे. जीवनात शिस्त बाळगून मोबाईल व सोशल मीडियापासून लांब राहण्याचा मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी संदेश दिला.

अ.ए.सो. च्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडले. या स्नेहसंमेलनात विविधतेने नटलेल्या भारतीय संस्कृती व परंपरेचे दर्शन घडविण्यात आले. विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक सरस सांस्कृतिक कार्यक्रम सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. उपस्थित प्रेक्षक व पालकांनी त्यांना टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. महाराष्ट्रातील पारंपारिक लेझिम व ढोल पथकाने उपस्थितांचे लक्ष वेधले.

पहिल्या दिवशी इयत्ता ५ वी ते ८ वी या वर्गाच्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन मनपा आयुक्त यशवंत डांगे तर दुसऱ्या दिवशी झालेल्या इयत्ता ९ ते १२ वी वर्गाच्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन पोलीस उपअधीक्षक (ग्रामीण) संपत भोसले यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने झाले. प्रारंभी पाहुण्यांचे ढोल पथकाच्या गजरात स्वागत करुन विद्यार्थ्यांनी ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले. यावेळी संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सहकार्यवाह गौरव फिरोदिया, खजिनदार प्रकाश गांधी, विश्वस्त मंडळाच्या सदस्या सुनंदाताई भालेराव, ॲड. गौरव मिरीकर, सल्लागार मंडळाचे सदस्य भूषण भंडारी, सुनीता मुथा, पुष्पाताई फिरोदिया, विद्यालयाचे प्राचार्य उल्हास दुगड, उपप्राचार्या आशा सातपुते, पर्यवेक्षक बाळासाहेब वाव्हळ, विष्णू गिरी, कैलास साबळे, शिक्षक प्रतिनिधी उज्वला भंडारी, विद्यार्थी प्रतिनिधी ओंकार चेमटे, विद्यार्थिनी प्रतिनिधी श्रुती रकटाटे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

प्रास्ताविकात छायाताई फिरोदिया म्हणाल्या की, शालेय जीवन हा आयुष्याचा पाया आहे. शालेय स्नेहसंमेलनातील आठवणी कायम स्मरणात राहतात. शिक्षक व पालक हा मुलांच्या जीवनाचा पाया मजबूत करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या आयुष्यात आपल्या शिक्षकांचे व पालकांचे मार्गदर्शन घेऊन आयुष्यात पुढे जावे. पालक व विद्यार्थी यांचा संवाद हा अत्यंत गरजेचा आहे. पालकांनी देखील आपल्या मुलांची आवड–निवड ओळखून त्यांना प्रोत्साहन देण्याचे त्यांनी सांगितले. विद्यालयाचे प्राचार्य उल्हास दुगड यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

पोलीस उपअधीक्षक (ग्रामीण) संपत भोसले म्हणाले की, दीडशे वर्षांची परंपरा लाभलेल्या अहमदनगर एज्युकेशन सोसायटी मधील माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात आघाडीवर आहेत. या संस्थेत शिक्षण घेताना प्रत्येक विद्यार्थ्याला अभिमान असावा, असे कार्य संस्थेचे आहे. विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा वापर करताना ओळख नसलेल्या व्यक्तीशी जवळीक साधू नये. यामुळे अनेक गंभीर धोके निर्माण होत आहे. आपली संगत ही नेहमी आदर्श ठेवावी. अडीअडचणींसाठी आपण आपल्या गुरुजनांवर विश्वास ठेवावा व त्यांचे मार्गदर्शन घ्यावे. दहावीनंतर भविष्यातील ध्येय ठरवा. मनापासून इच्छा असल्यास त्या क्षेत्रात यश प्राप्ती होते. शालेय जीवन हा जीवनाचा पाया असल्याचे स्पष्ट करुन त्यांनी विद्यार्थ्यांना सजग व जागरुक राहण्याचे आवाहन केले.

शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये शाळांतर्गत विविध परीक्षां व स्पर्धापरीक्षांमध्ये यश प्राप्त केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.पारितोषिक यादी वाचन दिपेश ओस्तवाल व दीपाली काळे यांनी केले. पहिल्या दिवशी इयत्ता ५ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांनी तमिळ नृत्य, देशभक्तीपर नृत्य, स्कूल चले हम आदी नृत्यांचे सादरीकरण केले. दुसऱ्या दिवशी शारीरिक शिक्षण प्रात्यक्षिकांचे थरारक कवायती सादर करण्यात आल्या. तर अपयशातून यशाकडे, पंजाबी रिमिक्स, सोशल मीडिया, गरबा, बाई पण भारी देवा, पावनखिंड, देशप्रेम आदी नृत्यांचे सादरीकरणाने कार्यक्रम रंगला होता. दोन दिवसीय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुक्रमे स्मिता म्हस्के, सतिश गुगळे आणि योगिनी क्षीरसागर व अध्यापक अमेय कानडे यांनी केले. सूत्रसंचालन अनुष्का पोळ व तनिष्का चोभे, सम्यक गुगळे, वेदांती पालवे, अक्षरा फुलसौंदर, ऋग्वेद छिंदम यांनी केले. तर आभार शिक्षक प्रतिनिधी उज्वला भंडारी यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता संगीत अध्यापक परशुराम मुळे यांनी वंदे मातरम या गीताद्वारे केली.

# श्रीराम संगीत विद्यालय आणि अनाहत तबला अकॅडमीतर्फे नगर येथे २५ डिसेंबर रोजी संगीत महोत्सवाचे आयोजन

नगर – श्रीराम संगीत विद्यालय आणि अनाहत तबला अकॅडमी यांच्या वतीने वर्धापनदिनानिमित्त आणि महामहोपाध्याय डॉ. देवीप्रसाद खरवंडीकर आणि ज्येष्ठ तबलावादक, गुरु पं. विनायकराव थोरात यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ २५ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत रावसाहेब पटवर्धन सभागृह, सावेडी, अहिल्यानगर येथे संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.


या कार्यक्रमाच्या पूर्वार्धात सकाळी ९ वाजता आग्रा घराण्याच्या ज्येष्ठ गायिका सौ. कविता खरवंडीकर यांची शास्त्रीय, उप शास्त्रीय व अभंग गायनाची मैफल होणार आहे. त्यांना तबल्यावर धनंजय खरवंडीकर आणि संवादिनीवर मकरंद खरवंडीकर हे साथसंगत करणार आहेत. त्यानंतर श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळ, पाथर्डी संचलित आनंद म्युझिक अकॅडमी, श्रीराम संगीत विद्यालय आणि अनाहत तबला अकॅडमीच्या सर्व विद्यार्थ्यांचे समूह गायन, स्वतंत्र व समूह तबला वादन, कथक नृत्य, संवादिनी वादन सादर होणार आहे. त्यांना लेहऱ्यावर प्रा. किरण जोशी, संतोष कुलट, संकेत सुवर्णपाठकी, शौनक कुलकर्णी, श्रेया सुवर्णपाठकी, नेहा दरवडे, गीतांजली सगम, राधिका कोल्हे हे करणार आहेत.

त्यानंतर उत्तरार्धात सायं. ६ वाजता शेखर दरवडे यांचे स्वतंत्र तबला वादन व त्यानंतर ६.३० वाजता आंतरराष्ट्रीय गायक पवन श्रीकांत नाईक यांची राग संगीत व मराठी, हिंदी व ब्रज भाषेतील गीतांची गायन मैफल सादर होणार आहे. त्यांना साथसंगत – कल्याण मुरकुटे व ऋतुजा पाठक (संवादिनी), स्मिता राणा (सतार), कुलदीप चव्हाण (बेंजो), शेखर दरवडे (तबला). सहवादक – मूलांशु परदेशी व राधिका परदेशी. सहगायक – श्रेयस शित्रे, नवरतन वर्मा, पवन तळेकर व निनाद पारखी, निवेदक – सुनील मधुकर कात्रे करणार आहेत.

या कार्यक्रमाने मैफिलीची सांगता होईल. माणिक देव आणि प्रचिती सुवर्णपाठकी सूत्रसंचालन करणार आहेत. तरी सर्व संगीत साधकांनी, रसिकांनी, संगीतप्रेमी यांनी उपस्थित राहावे असे आवाहन श्रीराम संगीत विद्यालयाचे संचालक शेखर दरवडे व अनाहत तबला अकॅडमीचे संचालक प्रसाद सुवर्णपाठकी यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लवकरच राळेगणसिध्दीस भेट देणार

## भाजपचे विनायकराव देशमुख



माजी मुख्यमंत्री व खासदार अशोकराव चव्हाण यांनी नागपुर येथे विधानभवनात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी विनायकराव देशमुख व माजी आ. अमर राजूरकर हे उपस्थित होते.

नगर – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे लवकरच राळेगणसिद्धी येथे येण्याची शक्यता आहे, अशी माहिती भाजपाचे विनायकराव देशमुख यांनी दिली.

श्री.देशमुख यांनी नागपुर येथे खा. अशोकराव चव्हाण यांच्या समवेत विधानभवनात ना.देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी मा.आ. अमर राजूरकर हे उपस्थित होते.

यावेळी ना. फडणवीस व खा.अशोकराव चव्हाण यांनी सद्य राजकीय परिस्थिती, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, जनजीवन मिशन योजना व अन्य विषयांवर चर्चा केली. या चर्चेच्या दरम्यान मुख्यमंत्री ना.फडणवीस यांनी ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णासाहेब हजारे यांच्या प्रकृतीविषयी श्री.देशमुख यांच्या कडे विचारणा केली. तसेच लवकरच राळेगणसिद्धी येथे येऊन श्री.हजारे यांची भेट घेण्यासंदर्भात सुतोवाच केले.

ना.फडणवीस व खा.चव्हाण या दोन्ही नेत्यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत भाजपा मोठे यश मिळवेल, असा विश्वास व्यक्त केला.

# ‘सततची तापमान वाढ पृथ्वीसाठी चिंतेचा विषय’ यावर संशोधन होणे गरजेचे

## स्नायडर इलेक्ट्रिकल्सचे इंजिनियर अरविंद पारगावकर यांचे प्रतिपादन

नगर – निसर्गातील सततचा बदल हा मानवी जीवनाला अपायकारक ठरत आहे एकाच दिवशी वर्षातील तीनही ऋतूंचा अनुभव आपल्याला अनेकदा येतात सकाळी थंडी दुपारी ऊन रात्री पाऊस अशी परिस्थिती वारंवार अनुभवाला येते १८ व्या शतकापासून होणारी सततची तापमान वाढ पृथ्वीसाठी अतिशय चिंतेचा विषय असून यावर मोठ्या प्रमाणावर संशोधन होणे अतिशय गरजेचे आहे नाहीतर ग्लोबल वार्मिंग मुळे होणारे दुष्परिणाम मानवी जीवनावर दुर्गामी परिणाम करतील, असे प्रतिपादन स्नायडर इलेक्ट्रिकल्सचे इंजिनियर अरविंद पारगावकर यांनी केले.

विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात यांत्रिकी विभागात दोन दिवस आंतरराष्ट्रीय परिषद झाली. या परिषदेचे उद्घाटन पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील स्व.बाळासाहेब विखे पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलनाने करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी अरविंद पारगावकर, डॉ.संजय सावंत, डॉ.संदीप काळे डॉ.पी.एम. गायकवाड, प्राचार्य डॉ.उदय नाईक, प्रा.सुनिल कल्हापुरे, डॉ.अभिजीत दिवटे, डॉ.रवींद्र नवथर तसेच ऑनलाइन पद्धतीने पार पडलेल्या या परिषदे मध्ये देशातील विविध प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला.

यंत्र अभियांत्रिकी विभाग आणि टेक्नॉलॉजी रिसर्च अँड इनोवेशन सेंटर, अकॅडमी ऑफ नॅनोटेक्नॉलॉजी अँड वेस्ट वॉटर इनोव्हेशन जोहान्सबर्ग साउथ आफ्रिका आणि कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, कोयनंट युनिव्हर्सिटी ओटा नायजेरिया यांच्या संयुक्त विद्यमाने मटेरियल सायन्स या विषयाच्या चौथ्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आणि ॲडव्हान्सेस इन एनर्जी और एन्व्हायरमेंटल इंजीनियरिंग या विषयाच्या पहिल्या अशा एकूण दोन आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करण्यात आले होते.

सदरील आंतरराष्ट्रीय परिषदेत मटेरियल सायन्स आणि एनर्जी ॲण्ड पन्तहायरमेंट इंजीनियरिंग या विषयात काम करणारे संशोधक शास्त्रज्ञ या विषयातील शैक्षणिक तज्ञ सहभागी झाले होते. या आंतरराष्ट्रीय परिषद हायब्रीड मोड म्हणजेच इन पर्सन आणि ऑनलाइन पद्धतीने पार पडली. या परिषदेच्या माध्यमातून मटेरियल सायन्स एनर्जी इंजीनियरिंग आणि एन्व्हायरमेंटल इंजीनियरिंग या विषयात होत असलेल्या अत्याधुनिक संशोधना संदर्भात सादरीकरणासाठी विविध असे एकूण सुमारे ३४८ शोध निबंध प्राप्त झाले या मधून निवडक १४८ शोध निबंधांचे एकूण १७ सत्रांमधून सादरीकरण झाले.



विळद घाट येथील डॉ. विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, पद्मभूषण स्व. बाळासाहेब विखे पाटील यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन दीपप्रज्वलन करण्यात आले यावेळी अरविंद पारगावकर डॉ. संजय सावंत, सुनील कल्हापुरे, प्राचार्य डॉ. उदय नाईक, डॉ. अभिजित दिवटे, डॉ. रविंद्र नवथर आदि (छाया – विजय मते)


## डॉ. विखे पाटील अभियांत्रिकीतील यांत्रिकी विभागात आंतरराष्ट्रीय परिषद

निवडक शोधनिबंध हे भारतातील नामांकित आयआयटी तसेच एनआयटी महाविद्यालयाचे तसेच इतर अल्बानिया, अल्जेरिया, फ्रान्स, मोरक्को, पेरु, पोलंड, रशिया, साऊथ आफ्रिका, तैवान, गायलंड, मलेशिया, मॉरिशस, इटली, इंडोनेशिया, इराण तुर्की कतार, तैवान, ऑस्ट्रेलिया, यूएसए, बांगलादेश आणि ओमान अशा एकूण २८ देशातून ९०० पेक्षा जास्त लेखकांकडून शोधनिबंध प्राप्त झाले होते. या परिषदेसाठी की नोट स्पीकर्स म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरातून प्रा. डेव्हिड वुड रिल्यूआर एनर्जी युनिव्हर्सिटी ऑफ कॅलेंगी केंजड़ा, प्रा. बीरा गुडे, एनर्जी अँड एन्व्हायरमेंट डायरेक्टर ऑफ नॉर्थ वेस्ट वॉटर इन्स्टिट्यूट यूएसए प्रा. सुटेरीस कालोगिक डिपार्टमेंट ऑफ मेकॅनिकल इंजिनिअरिंग मटेरियल सायन्स युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी लिमा सोल सायप्रस यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.

अरविंद पारगावकर यानी सदरील आतरराष्ट्रीय परिषद म्हणजे मटेरियल, एनर्जी आणि एन्व्हायरमेंट यासंदर्भात होत असलेल्या अत्याधुनिक संशोधना संदर्भात संयुक्त प्लॅटफॉर्म सर्वांना उपलब्ध करून दिल्याचे सांगून हा एक दुग्ध शर्करा योग असल्याचे मत नोंदविले, श्री महेश निपानीकर मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की वेगवेगळ्या मटेरियल्स, साधन सामुग्री संदर्भात माहिती देऊन कंपोझिट्स, नैनी कंपोझिट या अत्याधुनिक मटेरियल चे अभियांत्रिकी क्षेत्रातील महत्त्व विशद केले शिवाय कार्बन फुटप्रिंट तसेच सस्टेनेबिलिटी यावरही प्रकाश टाकला. आणि डॉ. संजय सावंत यांनी रिसर्च मेथोडोलॉजीचे अभियांत्रिकेतील महत्त्व विशद करून, इंडस्ट्री ४.० संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. ब्लॉक चैन टेक्नॉलॉजी, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि इंटरनेट ऑफ थिंग्स याचे दैनंदिन जीवनातील महत्व सांगितले. तसेच फाउंडेशनचे जनरल सेक्रेटरी डॉ.पी.एम. गायकवाड, संचालक डॉ.अभिजीत दिवटे, उपसंचालक प्रा.सुनील कल्हापूरे, प्राचार्य डॉ.उदय नाईक, महाविद्यालयातील सर्व अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख तर आंतरराष्ट्रीय परिषदेत ऑनलाइन पद्धतीने, जगभरातील विविध विद्यापीठातील शैक्षणिक तज्ञ तसेच डॉ. संदीप काळे डायरेक्टर टेक्नॉलॉजी रिसर्च अँड इनोवेशन सेंटर इंडिया डॉ.अजय मिश्रा अकॅडमी ऑफ नॅनोटेक्नॉलॉजी ॲड वेस्ट वॉटर इनोवेशन्स जोहान्सबर्ग साउथ आफ्रिका, डॉक्टर संडे ओयेडेपो, मेकॅनिकल इंजिनिअरिंग डिपार्टमेंट कॉलेज ऑफ इंजीनियरिंग कोवेनंट युनिव्हर्सिटी ओटा नायजेरिया आदी सहभागी झाले.

उद्‌घाटन प्रसंगी मार्गदर्शन करत असताना डॉ. संडे ओये डेपो यांनी इंजीनियरिंग क्षेत्रात इंटर डिसिप्लिनरी क्षेत्रात रिसर्च चे महत्व विशद करून परिषदेस शुभेच्छा दिल्या. आणि ही आंतरराष्ट्रीय परिषद हायब्रीड मोडमध्ये असल्या कारणाने एकूण १५ शोधनिबंधाचे सादरीकरण ऑफलाइन मोड मध्ये आले आणि उर्वरित शोधनिबंधाचे सादरीकरण ऑनलाईन मोड मधून पार पडले. तसेच यंत्र अभियांत्रिकीचे विभाग प्रमुख डॉ. रवींद्र नवधर यांनी या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या आयोजनासाठी विशेष प्रयत्न करून मटेरियल सायन्स, एनर्जी ॲड एन्व्हायरमेंटल इंजीनियरिंग या परिषदेत सहभागी झालेल्या रिसर्च स्कॉलर्स इंडस्ट्रीमध्ये काम करणारे तज्ञ, शैक्षणिक संस्थातील प्राध्यापक आणि विद्यार्थी यांनी सदरील आंतरराष्ट्रीय परिषदेचा प्लॅटफॉर्गे म्हणून उपयोग करून आपल्या संशोधनास या परिषदेच्या माध्यमातून शोकेस केल्याबद्दल त्यांचे आभार मानले. डॉ. कानिफ मरकड यांनी कन्व्हेनर म्हणून काम पाहिले. सुत्रसंचालन प्राध्यापिका श्रीमती सुप्रिया गाडे यांनी केले.

# राज्यस्तरीय मास्टर गेम स्पर्धेत सहाय्यक फौजदार अन्वर सय्यद यांना २ सुवर्णपदके



राज्यस्तरीय मास्टर गेम स्पर्धेत सहाय्यक फौजदार अन्वर सय्यद यांना २ सुवर्णपदके मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करताना पोलिस अधिक्षक राकेश ओला.

नगर – अहिल्यानगर पोलीस दलातील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सय्यद अन्वर अली यांनी नाशिक येथील मीनाताई ठाकरे स्टेडियम येथे झालेल्या राज्यस्तरीय मास्टर गेम्स स्पर्धेत दोन सुवर्णपदक मिळविले.

दि.१४ व १५ डिसेंबर रोजी नाशिक येथे झालेल्या राज्यस्तरीय मास्टर गेम स्पर्धेत सहाय्यक फौजदार अन्वर सय्यद यांनी अडथळा धावणे स्पर्धेत, १०० मीटर व ११० मीटर धावणे या स्पर्धेत दोन सुवर्णपदक मिळवले. या स्पर्धेच्या यशानंतर अन्वर सय्यद यांची ओडीसा येथील भुवनेश्वर येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

सय्यद अन्वर यांना राखीव पोलीस निरीक्षक उमेश परदेशी (पोलीस मुख्यालय) पोलीस उपनिरीक्षक व्हिक्टर जोसेफ आणि सर्व प्रशिक्षक वर्ग यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. सय्यद अन्वर यांना मिळालेल्या यशाबद्दल त्यांचे पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी त्यांचा सत्कार केला.

# मातोश्री वृद्धाश्रमात स्नेहबंधतर्फे अन्नदान



मातोश्री वृद्धाश्रमात स्नेहबंधतर्फे अन्नदान करताना स्नेहबंधचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे समवेत दिलीप चोरडिया, दिनेश जाधव, प्रतिक डहाळे.

नगर – विळद घाटातील मातोश्री वृद्धाश्रमात स्नेहबंध सोशल फाउंडेशनच्यावतीने अन्नदान देण्यात आले. या भोजन दानाने वृद्धाश्रमातील उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, दिनेश जाधव, प्रतिक डहाळे, पराग चितांबर, डॉ. अक्षय, स्वयंम बास्कर, वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक दिलीप चोरडिया आदी उपस्थित होते.

सावेडीतील ताठे मळ्यातील अनिता व सुनील पांडुरंग ताठे परिवारातर्फे भोजन देण्यात आले. या अन्नदानाबाबत वृद्धाश्रमातील वृद्धांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव उमटले होते. त्यातील काही जण म्हणाले, या वृद्धाश्रमात बाराही महिने चैतन्यपूर्ण वातावरण असतं. नव्याने येणाऱ्या वृद्धांना सुरुवातीचे काही दिवस निश्चितच जड जातात. मात्र इलाज जरी नसला तरी आयुष्याचा अखेरच्या टप्प्यात रक्ताच्या नात्यांपेक्षाही सोबतचे लोक आपुलकीचे वाटतात.

जागतिक ध्यान दिना निमित्त

# सहजयोग परिवारातर्फे नगरमध्ये दोन दिवस महालक्ष्मी पथ सिनेमाचे विनामूल्य आयोजन



नगर – संयुक्त राष्ट्र संघाने नुकतेच २१ डिसेंबर हा दिवस जागतिक ध्यान दिन म्हणून साजरा करण्याचे सर्व देशांना आवाहन केले आहे.

मेडिटेशन म्हणजेच ध्यानधारणा ही सामूहिकतेत केल्याने त्याचे प्रचंड फायदे झाल्याचे जगभरातील शास्त्रज्ञांना दिसून आल्याचे संयुक्त राष्ट्र संघाने म्हटले आहे. सहजयोग ध्यानधारणा साधना ही सर्व जाती धर्माच्या व सर्व वयोगटातील स्त्री–पुरुषांसाठी विनामूल्य आहे व ती सहजपणे करता येते. त्यासाठी कुठल्याही प्रकारचे व्यायाम करावे लागत नाही. साधे सोपे ध्यान आहे.

अहिल्यानगर सहजयोग परिवाराच्या वतीने आशा स्क्वेअर या सिनेमा गृहात सहजयोगावर आधारित महालक्ष्मी पथ हा सिनेमा नगरकरांना २१ डिसेंबरला सकाळी ९.४५ वा. व २२ डिसेंबरला सकाळी ९.४५ वा. असे दोन्ही दिवस विनामूल्य दाखविण्यात येणार असल्याची माहिती माताजी श्री निर्मला देवी प्रणित सहजयोग चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष श्रीनिवास बोज्ञा, चंद्रकांत रोहोकले, कुंडलिक ढाकणे व अमित बुरा यांनी दिली आहे.

ज्यांना ध्यानधारणा शिकायची आहे त्यांनी १८०० २७०० ८०० या टोल फ्री नंबर वर कॉल केल्यावर संपूर्ण माहिती दिली जाईल. ध्यानधारणे संदर्भातील व्हिडिओच्या लिंक पाठवल्या जातील. तसेच दर शनिवारी सायंकाळी ५ वाजता लर्निंग सहजयोगा यूट्यूब चैनलवर आपणांस नवीन साधकांसाठी असलेले विनामूल्य मार्गदर्शन असते त्याचा आपण अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा समन्व्यक डॉ. अशोक अकोलकर यांनी केले आहे.

https://www.learningsahajayoga.org ७४४७४४१५०५ हा व्हॉट्सॲप नंबर सेव केल्यावर तो ओपन करून Marathi हा शब्द टाईप केल्यावर मराठी भाषेतील ध्यानधारणे विषयीचे सर्व व्हिडिओची लिंक आपल्याला मिळेल. ही लिंक ओपन करून आपण ध्यान धारणा शिकू शकता.

Hindi टाइप केल्यावर हिंदी भाषेतील सर्व माहितीचे व्हिडिओ बघायला मिळतील. English हा शब्द टाईप केल्यावर इंग्रजी भाषेतील सर्व व्हिडिओची लिंक मिळेल.

जागतिक ध्यान दिनानिमित्ताने २१ डिसेंबर रोजी Learning Sahajayoga YouTube Channel वर लाईव्ह कार्यक्रमाद्वारे ४ वाजता इंग्रजीत, ५ वाजता हिंदीत आणि ६ वाजता मराठी भाषेतून सहज योग ध्यान कार्यक्रम आयोजित केला आहे. प्रत्येक कार्यक्रम ३० मिनिटांचा असेल.

याचा सर्व ध्यानधारणा शिकू इच्छिणाऱ्या साधकांनी लाभ घ्यावा असे आवाहन सहजयोग ध्यान केंद्र पारोळा तर्फे तालुकाप्रमुख संजय चौधरी सर यांनी केले आहे.

# पालकांनीही विचारांची देवाणघेवाण केल्यास भविष्यात देशासाठी जागरूक नागरिक घडेल

## उद्योजक व विपणन सल्लागार शंतनू खानविलकर, बाई इचरजबाई फिरोदिया शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

नगर – प्रत्येक विद्यार्थ्याने दोन अतिरिक्त भाषा शिकाव्यात. व्यायामाला महत्व द्यावे. प्रत्येक वर्षात एक नवीन कौशल्य शिकावे. भविष्यातील आव्हाने व परिस्थिती पाहता सर्व मुलांना स्वयंपाक यायला हवा. पालकांनी मुलांना संत महात्म्यांचा सहवास घडवून आणावा. मुलांसमवेत कुटुंबाने सामजिक संस्थांना भेटी द्याव्यात. पालकांनीही चांगल्या विचारांची देवाणघेवाण केल्यास भविष्यात देशासाठी जागरूक नागरिक घडेल, असे प्रतिपादन उद्योजक व विपणन सल्लागार शंतनू खानविलकर यांनी केले.



अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेतील वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभाचे आकाशात फुगे सोडून उद्घाटन करताना उद्योजक शंतनू खानविलकर समवेत संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, विश्वस्त सुनंदा भालेराव सल्लागार मंडळाचे सदस्य भूषण भंडारी मुख्याध्यापिका ज्योती सिसोदिया शिक्षक प्रतिनिधी कांतीलाल खुरंगे आदी.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या बाई इचरजबाई फिरोदिया प्रशालेतील पूर्व प्राथमिक वर्ग व इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ रा.ब.डॉ. मोने कला मंदिरात इयत्ता दुसरी ते चौथीच्या वर्गातील विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ नुकताच पार पडला. यावेळी अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, विश्वस्त सुनंदा भालेराव, गौरव मिरीकर सल्लागार मंडळाचे सदस्य भूषण भंडारी, सदस्या सुनीता मुथा, मुख्याध्यापिका ज्योती सिसोदिया, पूर्व प्राथमिक इन्चार्ज वनिता चौधरी, वर्षा चिखले, शिक्षक प्रतिनिधी कांतीलाल खुरंगे शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया म्हणाल्या, की शालेय आठवणी कायम स्वरुपी लक्षात राहतात. मुलांनो तुमच्या जीवनाचे तुम्हीच शिल्पकार आहात. विद्यार्थीनी स्वतः गुणवत्ता वाढीसाठी व स्पर्धा परीक्षांसाठीची तयारी करावी. असेही त्या म्हणाल्या. संस्थेतील शिक्षकांकडून गुणवत्ता वाढीसाठी सातत्याने प्रयत्न केले जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

डॉ. सचिन वहाडणे म्हणाले, की स्पर्धा परीक्षांच्या युगात अभ्यासाच्या पद्धती महत्त्वाच्या आहेत. विद्यार्थ्यांनी लिखाण कामाला वेळ द्यावा. विद्यार्थ्यांना स्क्रीन पासून दूर ठेवण्याचे पालकांपुढे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. दोन वर्ष पर्यंतच्या मुलांना तर मोबाईल देऊच नये. सुदृढ पोषणासाठी चौरस आहार घ्यावा. डॉ. सोनाली वहाडणे यांनी स्त्री पालकांना मुलांच्या आरोग्यासाठी मोलाचा सल्ला दिला.

प्रशालेतील विद्यार्थ्यांनी या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन केले होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन, बक्षीसांची यादी वाचन, पाहुण्यांची मुलाखतींचे प्रश्न विचारणे, बालचमूंच्या या उत्कृष्ट सादरीकरणाचे पाहुण्यांसह सर्वच उपस्थितांनी विशेष कौतुक केले. भव्यदिव्य स्टेज, लाईटींग, ध्वनीव्यवस्था, चोख नियोजन, वेळेचे काटेकोर पालन, नृत्य व कार्यकम सादरीकरणासाठी शालेय प्रशासनाने घेतलेले कष्ट यामुळे संपूर्ण कार्यक्रम देखणा झाला होता. स्नेहसंमेलनात नृत्य, नाट्य, प्रबोधनात्मक गाण्यांचे सादरीकरण करण्यात आले. सादर केलेल्या सर्वच सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रतिसाद मिळाला. यावेळी राज्य, जिल्हा पातळीवरील विविध स्पर्धांमध्ये विजेते, शिष्यवृत्ती परिक्षेत मेरीटमध्ये आलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीसे प्रदान करण्यात आली. यादीवाचन पराग विलायते, वैशाली निकम यांनी केले. सूत्रसंचालन सविता शेळके व कांचन नेहुल यांनी केले आभार कांतीलाल खुरंगे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विशाल तांदळे, वैभव वाघ, प्रसाद शिंदे, शरद कातोरे यांच्यासह सर्व शिक्षकांनी प्रयत्न केले.

# ३ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू करण्याचा आदेश निर्गमित करावा

## थकबाकीसह वाढीव महागाई भत्ता जानेवारीच्या वेतनासोबत वितरित करा

नगर – केंद्र शासनाने घोषित केल्याप्रमाणे १ जुलै २०२४ पासून ३ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू करण्याचे शासन आदेश निर्गमित करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने राज्य सरकारकडे करण्यात आली आहे. शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष तथा माजी शिक्षक आमदार तथा नागो गाणार व नागपूर विभागाचे कोषाध्यक्ष संतोष द. सुरावार यांनी सदर मागणीचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, शिक्षण सचिव कुंदन मॅडम व शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांना दिले असल्याची माहिती शिक्षक परिषदेचे शहर जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

केंद्र शासनाने केंद्रीय कर्मचाऱ्यांना १ जुलै २०२४ पासून ३ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू केला आहे. महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार राज्य शासकीय कर्मचारी आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १ जुलै २०२४ पासून ३ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू करणे अत्यावश्यक व निकडीचे आहे. त्यामुळे १ जुलै २०२४ पासून ३ टक्के वाढीव महागाई भत्ता थकबाकी सह देण्याचा निर्णय राज्य शासनाने घोषित करावा, अशी राज्यातील शिक्षक, कर्मचाऱ्यांची भावना असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

केंद्र शासनाने घोषित केल्याप्रमाणे १ जुलै २०२४ पासून ३ टक्के वाढीव महागाई भत्ता लागू करावा, यासाठी शासन आदेश त्वरित निर्गमित करून थकबाकीसह वाढीव महागाई भत्ता जानेवारी २०२५ च्या वेतनासोबत वितरित करण्याची मागणी शिक्षक परिषदेने केली असल्याचे बाबासाहेब बोडखे यांनी म्हटले आहे.



## पारनेर येथे स्वदर्शन भवन नूतन वास्तूचे उद्घाटन

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या पारनेर सेवाकेंद्राच्या स्वदर्शन भवन या नूतन वास्तूचे उद्घाटन संस्थेच्या ग्राम विकास प्रभागाच्या राष्ट्रीय समन्वयक राजयोगिनी ब्रह्माकुमारी सुनंदा दीदी यांनी नारळ वाढवून केले. यावेळी पारनेर सेवाकेंद्राच्या प्रभारी ब्रह्माकुमारी साधना दीदी, खासदार निलेश लंके यांच्या पत्नी राणीताई लंके, राजयोगी बी के दशरथ भाईजी, अहिल्यानगर सेवाकेंद्राच्या प्रभारी ब्रह्माकुमारी राजेश्वरी दीदी, श्रीगोंदा सेवाकेंद्राच्या प्रभारी ब्रह्माकुमारी सुप्रभा दीदी, जामखेड सेवाकेंद्राच्या प्रभारी ब्रह्माकुमारी भारती दीदी व बी.के. डॉ. दीपक हरके उपस्थित होते.

# स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांसाठी व्यासपीठ खुले

## ॲड. विकी मुथा यांचे प्रतिपादन, दादा चौधरी मराठी शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात

नगर – दादा चौधरी मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांची प्रगती कौतुकास्पद आहे. हिंद सेवा मंडळाचे शताब्दी वर्ष साजरे होत आहे. तर दादा चौधरी मराठी शाळेला ७३ वे वर्षाची दैदीप्यमान परंपरा लाभलेली आहे. विद्यार्थ्यांना स्नेहसंमेलनातून विविध गुणदर्शन सादर करता येतात. स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा विकास होतो. तसेच स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांसाठी व्यासपीठ खुले झाले आहे, असे प्रतिपादन उद्योजक ॲड. विकी मुथा यांनी केले आहे.

हिंद सेवा मंडळाच्या दादा चौधरी मराठी शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभाचे उद्घाटन उद्योजिका काजल राऊत यांच्या हस्ते हिंदसेवा मंडळाच्या ध्वजाचे अनावरण करून करण्यात आले. विद्यार्थ्यांनी स्नेहसंमेलनात मराठी शाळा टिकल्या पाहिजेत व मोबाईलचे दुष्परिणाम या नाटिका सादर केल्या तसेच देशभक्तीपर गीतांनी स्नेहसंमेलनाचा रंगा चढला होता. काजल राऊत यांनी शाळेला डिजिटल कलर टीव्ही भेट दिला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. विकी मुथा हे होते. तर प्रमुख उपस्थितीत उद्योजिका काजल राऊत, रोटरी डिस्टिक्ट मा. गव्हर्नर शिरीष रायते, माजी नगरसेवक संजय चोपडा, वेतन पथक प्राथमिकचे अधीक्षक हेमंत साळुंके, हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, कार्याध्यक्ष ॲड.अनंत फडणीस, मानद सचिव संजय जोशी, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, दादा चौधरी मराठी शाळेचे चेअरमन सुमतीलाल कोठारी, हिंदसेवा मंडळाचे कार्य.सदस्य ज्योतीताई कुलकर्णी, जगदीश झालानी, अशोक उपाध्ये, रणजीत श्रीगोड, शालेय समिती सदस्य विजय कोठारी, सौ.माधुरी कुलकर्णी, अजय लुंकड, जयकुमार रंगलानी, सेवक प्रतिनिधी सहाय्यक सचिव बी.यु. कुलकर्णी, प्राचार्य सुनील सुसरे, कल्याण लकडे, आदिनाथ जोशी, माजी मुख्याध्यापक संजय मुदगल, मुख्याध्यापक विठ्ठल ढगे, रोहिणी फळे, जयश्री नन्नवरे, प्रा.अनुरीता झगडे, दादा चौधरी मराठी शाळेचे मुख्याध्यापक सुभाष येवले, शिक्षक प्रतिनिधी दिलीप परसपाटकी, स्नेहसंमेलन प्रमुख सौ.शितल पवार, विद्यार्थीनी प्रतिनिधी कुमारी प्रणाली पतंगे, विद्यार्थी प्रतिनिधी चिरंजीव विराज राठोड, पालक प्रतिनिधी डॉक्टर संतोष कराळे, भीमराव जावळे, प्रियंका आढाव, मनोज हिरणवाळे, मोहन जाधव आदी उपस्थित होते.



दादा चौधरी मराठी शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभाचे उद्घाटन हिंदसेवा मंडळाच्या ध्वजाचे अनावरण करून करण्यात आले.

काजल राऊत म्हणाले, संस्कृती व शिक्षणाचा वारसा हा शाळेतूनच मिळतो. दादा चौधरी मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी हिंद सेवा मंडळाचे सर्व पदाधिकारी प्रयत्नशील असतात. तसेच विद्यार्थ्यांनी आदर्श नागरिक बनावे. उच्चशिक्षित होऊन शाळेच्या नावलौकिकात भर घालावी.

शिरीष रायते म्हणाले, देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात मौल्यवान योगदान देणारे सेनापती दादा चौधरी यांनी सुरू केलेली ही शाळा आहे. किती मोठे झालात तरी आई–वडील आणि गुरु यांना कधी विसरू नये.

प्रा.शिरीष मोडक म्हणाले, अतिशय उत्साहाच्या वातावरणात स्नेहसंमेलन साजरे होत आहे. रंगीबेरंगी कपडे व वेशभूषा करून छोटी बालके मोठ्या उत्साहाने व आनंदाने स्नेहसंमेलनात सहभागी होतात. स्नेहसंमेलन एक विद्यार्थ्यांसाठी पर्वणीच आहे. विद्यार्थ्यांनी मोठे व्हावे, यशस्वी व्हावे व देशाचे आदर्श नागरिक व्हावे.

हेमंत साळुंके म्हणाले, सर्व मंडळाचे पदाधिकारी व शाळेतील शिक्षक यांचा समन्वय चांगला असल्याने विद्यार्थ्यांच्या प्रगतीत वाढ होत आहे.

प्रास्ताविकात सुमतीलाल कोठारी म्हणाले, प्राथमिक शिक्षण हा विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्वाचा पाया आहे.पालकांनी विद्यार्थ्यांचा पाया मजबूत करून द्यावा. पुढील जीवनात यशस्वी होण्यासाठी त्याचा निश्चितच फायदा होईल. विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी हिंदसेवा मंडळाचे सर्व पदाधिकारी यांचे अनमोल सहकार्य मिळत असते.

मुख्याध्यापक सुभाष येवले यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शीतल पवार व वैशाली डफळ यांनी केले तर आभार प्रिया अहिरे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी शाळेतील विद्यार्थी, पालक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



जय बजरंग प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे स्नेहसंमेलनामध्ये आशाताई फिरोदिया आदी.

# विद्वत्तेचा मार्ग आपल्यातील प्रामाणिकपणातून जातो

## आशाताई फिरोदिया यांचे प्रतिपादन, जय बजरंग विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन साजरे

नगर – विद्वत्तेचा मार्ग प्रामाणिकपणातूनच जातो याचे महत्त्व आशाताई फिरोदिया यांनी विशद केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात आशाताई फिरोदिया यांनी प्रामाणिकपणाचे महत्त्व विविध उदाहरणातून मुलांना समजून सांगितले.

तसेच शाळाबाह्य स्पर्धांमध्ये विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या एकूण ६८ विद्यार्थ्यांना आशाताई फिरोदिया यांच्या हस्ते बक्षीस व प्रमाणपत्र देऊन कौतुक करण्यात आले. आशा एज्युकेशन फाउंडेशन संचलित जय बजरंग प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे स्नेहसंमेलन १९ डिसेंबर रोजी कोहिनूर मंगल कार्यालय येथे उत्साहात झाले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती आशाताई फिरोदिया उपस्थित होत्या. तसेच संस्थेचे सहसचिव उमेश गांधी, संचालक सदस्य गौरव भंडारी, संस्थेचे व्यवस्थापक आशुतोष घाणेकर, प्राचार्या संगीता पाठक, प्राथमिकचे मुख्याध्यापक अमोल क्षीरसागर, तपोवन विभागाच्या मुख्याध्यापिका वर्षा कुसकर उपस्थित होत्या.

चारही विभागाच्या विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर आधारित एकूण १७ परफॉर्मन्स सादर केले. सदरील सादरीकरणास विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला. कार्यक्रमास तीनही विभागाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमोल क्षीरसागर यांनी केले आभार प्रदर्शन ज्येष्ठ शिक्षक रावसाहेब आल्हाट यांनी मानले.

# ड्रेनेजचे तूटलेले झाकण ठरते नागरिकांसाठी जीवघेणे



नगर – महापालिका हद्दीतील प्रभाग क्र. ११ मध्ये मुख्य बाजारपेठ असलेल्या गंज बाजारमध्ये नेहमी नागरिकांची खरेदी करता वर्दळ असते. येथे रस्त्याच्या मध्यभागी टूटलेले ड्रेनेजचे झाकण जीवघेणे ठरत आहे. येथे कोणतीही जीवीतहानी होऊ नये याकरीता त्याची त्वरित दुरुस्ती करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अल्पसंख्यांक शहर जिल्हाध्यक्ष अलतमश जरीवाला यांनी केली आहे.

गंज बाजारमध्ये सराफ बाजार व भाजी मंडई असल्याने मोठ्या प्रमाणावर नागरिक खरेदी करण्यासाठी येत असतात. या भागात धार्मिक स्थळ असल्याने महिला, जेष्ठ नागरिकांची या रस्त्यावर ये–जा असते, तसेच येथे पुढे शाळा असल्याने लहान मुलांचे प्रमाणही जास्त असते. तुटलेल्या झाकणामुळे मोठी जीवीतहानी होऊ शकते. या खड्ड्या पासून सावधान राहण्याकरिता व इजा होऊ नये यासाठी त्याला लाकडी बांबू व साहित्य लावले आहे.


आयुक्त व महापालिका प्रशासनाने त्वरित दखल घेऊन या झाकणाची दुरुस्ती करावी अशी मागणी जरीवाला यांनी केली आहे.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता



## अतिपाणी मेंदूला घातक?



'अति सर्वत्र वर्जयेत' असे आपल्याकडे एक समर्पक संस्कृत वचन आहे. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईटच असतो. मीठ, साखर, चॉकलेट, चहा, कॉफीसारख्या अनेक पदार्थांबाबत हा नियम लागू आहे. 'भरपूर झोप घ्यावी' असे तज्ज्ञ सांगतात म्हणून कुणी दिवसरात्र झोपा काढत राहिला तर ते हानिकारकच ठरते. रात्रीची सात ते आठ तासांची झोप आरोग्यासाठी उत्तम असते. तसाच प्रकार पाण्याचाही आहे. 'भरपूर पाणी प्यावे' असा सल्ला दिला जात असतो. मात्र पाणी पिण्यालाही काही मर्यादा असावी. अत्याधिक प्रमाणात पाणी पित राहिल्याने मेंदूला धोका संभवतो, असे तज्ज्ञ सांगतात. आपल्या शरीरासाठी पाणी महत्त्वाचे आहे. शरीराचा बराचसा भाग पाण्याने बनलेला आहे. आपले शरीर अन्न किंवा उर्जेशिवाय आठवडे किंवा कधीकधी महिने जाऊ शकते, परंतु पाण्याशिवाय आपण काही दिवसही जगू शकत नाही. जर आपल्याला पाणी मिळाले नाही तर काही काळ पाण्यामुळे आपले शरीर निर्जलीकरण होते, ज्यामुळे चक्कर येणे आणि इतर अनेक समस्या निर्माण होतात. मात्र जास्त पाणी पिणे हे शरीरासाठी अनेक प्रकारे हानिकारक आहे. जास्त पाण्यामुळे मेंदूला सूज येऊ शकते, ज्यामुळे मानसिक गोंधळ आणि डोकेदुखी सारख्या समस्या उद्भवतात. जास्त पाणी पिल्याने आपल्या शरीरातील रक्तदाब वाढतो, ज्यामुळे आपल्याला उच्च रक्तदाब, ब्रॅडीकार्डिया किंवा कमी हृदय गती सारख्या समस्यांना सामोरे जावे लागते.

पाण्यात सर्वाधिक हायड्रोजन असते. हायड्रोजन एक इलेक्ट्रोलाइट आहे, ज्यामुळे आपल्या शरीरात हायपोनेट्रेमिया सारखी स्थिती निर्माण होते. सोडियम हा आपल्या शरीरात आढळणारा एक आवश्यक घटक आहे, ज्याचे कार्य आपल्या पेशींच्या आत आणि बाहेर द्रव वाहतूक करणे आहे. जास्त पाणी प्यायल्याने आपल्या शरीरात असलेले सोडियम पातळ होते आणि त्यामुळे पेशींच्या आसपास आढळणारा द्रव शरीरातून लघवीद्वारे बाहेर पडतो. ♦♦♦



## पोह्यांचा नाश्ता आरोग्यदायी

आपल्याकडे अनेकांच्या घरी सकाळी न्याहारीसाठी कांदापोहे केले जात असतात. वजन कमी करण्यासाठी न्याहारी म्हणजेच ब्रेकफास्ट करणे अत्यंत आवश्यक आहे. जर तुम्ही योग्य न्याहारी खाल्ली, तर त्यामुळे शरीरात संपूर्ण दिवस ऊर्जा तर राहतेच; पण वजन कमी होण्यासही मदत होते. काही लोक वजन कमी करण्यासाठी सकाळचा नाश्ता टाळतात, परंतु यामुळे वजन कमी होण्याऐवजी वाढू शकते. वजन कमी करण्यासाठी पोहे हा एक आरोग्यदायी पर्याय आहे, असे आहारतज्ज्ञ सांगतात.

आहारतज्ज्ञांच्या मते, नाश्ता केल्याने तुम्ही सुमारे ५ किलो वजन कमी करू शकता. पोह्यांमध्ये लोह, फॉस्फरस, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए आणि कार्ब्स मोठ्या प्रमाणात आढळतात. त्यामध्ये अतिशय कमी कॅलरीज असतात. त्यामुळे वजन कमी करण्यासाठी हा एक चांगला पर्याय आहे. पोह्यात फायबरचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे बद्धकोष्ठता दूर होते. पोहे खाल्ल्याने पोट बराच काळ भरलेले राहते आणि भूक लागत नाही. त्यामुळे वजन घटवण्यास सहाय्य होते. पोहे पचायला सोपे आहेत. ज्यांची पचनशक्ती कमकुवत आहे, त्यांनी त्यांच्या आहारात पोह्यांचा समावेश करावा. हे आवश्यक नाही की तुम्ही पोहे फक्त नाश्त्यातच खाऊ शकता. रात्रीच्या जेवणात किंवा संध्याकाळच्या नाश्त्यातही खाऊ शकता. अर्थात, पोहे कमी तेलात करणे गरजेचे ठरते. ♦♦♦

## उंदरांमध्ये नव्या मूळपेशींचा शोध



स्टेमसेल्स म्हणजे मूळपेशी या शरीरातील अशा पेशी असतात, ज्यांचे रूपांतर शरीरातील कोणत्याही अवयवांच्या पेशींमध्ये करता येऊ शकते. त्यामुळे आधुनिक काळात अशा मूळपेशींवर मोठेच संशोधन झाले आहे व होत आहे. त्यांचा वापरही अनेक बाबतीत केला जात आहे. अमेरिकेत उंदरांमध्ये हाडे व कूर्चा तयार करणाऱ्या मूळपेशी ओळखण्यात भारतीय वैज्ञानिकांसह काही जणांना यश आले आहे. कोलंबिया विद्यापीठाच्या वैद्यकीय केंद्राच्या वैज्ञानिकांनी या पेशी शोधल्या असून त्यात ऑस्टिओ कोनड्रोरेटिक्युलर (ओसीआर) या मूळपेशींचा समावेश आहे, त्या उंदराच्या अस्थिमज्जेत आढळून येतात.


या पेशींनी आविष्कृत केलेल्या एका प्रथिनाच्या मदतीने या पेशी ओळखण्यात आल्या असून त्यात मार्करचा वापर केला असता ओसीआर पेशी स्वत: नवीन तयार होतात व नवीन हाड व कूर्चापेशी तयार करतात असे दिसून आले आहे. हाडाच्या पेशींना ऑस्टिओब्लास्ट व कूर्चापेशींना कोंड्रोसाइट्स असे म्हणतात. ओसीआर स्टेम सेल्स म्हणजे मूळपेशी या हाड तुटलेल्या ठिकाणी लावल्या तर हाड दुरुस्त होऊ शकते. जखमी झाल्यानंतर या पेशी अशा प्रकारे काम करण्यास प्रवृत्त होऊ शकतात, की नाही हे पाहणे बाकी आहे. जर उंदरात हाड मोडले तर या पेशी पुन्हा जिवंत करून हाड व कूर्चा तयार करता येतात. माणसामध्ये हे घडू शकते का याचा विचार अजून बाकी आहे, असे सीयूएमसीचे सहायक प्राध्यापक व लेखक सिद्धार्थ मुखर्जी यांनी सांगितले.

संशोधकांच्या मते ओसीआर मूळपेशी मानवी हाडांच्या उतीत असतात व उंदीर व माणसाचे जीवशास्त्र हाडांच्या बाबतीत सारखेच आहे. यात आणखी अभ्यास केला, तर ऑस्टिओपोरोसिस (हाडे ठिसूळ होणे) व ऑस्टिओआर्थायटिस (हाडांचा संधिवात), हाडे तुटणे यात फायदा होऊ शकतो. आमच्या मते ओसीआर मूळपेशी हाडांची भरून येण्याची क्षमता वाढवतात व जी क्षमता वयोपरत्वे कमी होत जाते. असे टिमोथी सी वॉंग, डोरोथी एल व डॅनियल एच सिलबर्ग या सीयूएमसीच्या प्राध्यापकांनी म्हटले आहे. प्रौढ ओसीआर पेशी या मेसेनशिमल स्टेम सेल (मूलपेशी-एमएससीएस) पासून वेगळ्या आहेत. त्यात हाडांच्या निर्मितीत प्रौढ वयात भूमिका पार पाडतात. एमएससीएस या मूळपेशी या हाडे, कूर्चा व मेद यांचा मूळ स्रोत असून आधुनिक अभ्यासानुसार या पेशी नवीन हाड किंवा कूर्चा तयार करीत नाहीत. ♦♦♦

## रोबोटिक नी रिप्लेसमेंट का फायद्याची?

आरोग्यवेध

सध्याची बदललेली जीवनशैली, व्यायामाचा अभाव, सतत लिफ्टचा वापर, दीर्घकाळ नियमित गाडीवर फिरणे, पोषणतत्वरहीत आहाराचे दीर्घकाळ सेवन, लठ्ठपणा यांसारख्या अनेक कारणांमुळे अलीकडील काळात सांधेदुखीची समस्या भेडसावणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. विशेषतः आपल्याकडे महिलांना स्वयंपाकादी कामांसाठी आयुष्यातील अनेक वर्षे दररोज ओट्यापुढे बरेच तास उभे राहावे लागते. तसेच घरातील कष्टाची कामे करावी लागतात.



तरुणपणात या सर्वांचे परिणाम जाणवत नाहीत; मात्र शरीर वृद्धत्वाकडे झुकू लागले की सांधेदुखीसारख्या त्रासाच्या रुपातून हे परिणाम दिसू लागतात. सांधेदुखीमध्ये गुडघ्यामध्ये होणाऱ्या वेदना असह्य स्वरुपाच्या असतात. अनेकदा पाय घसरून पडल्यामुळे, अपघातामुळे किंवा अन्य काही कारणांमुळे गुडघा फ्रॅक्चर होतो. गुडघ्यातील गुडघा फ्रॅक्चर झाल्यास वा दुखणे वाढल्यास रुग्णाला तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला आणि उपचार करणे आवश्यक ठरते. काही वेळा गुडघ्यातील सांध्यांची झीज इतकी झालेली असते की तो बदलण्याशिवाय पर्याय नसतो. पूर्वीच्या काळी गुडघेबदलाची शस्त्रक्रिया ही प्रचंड वेदनादायी असल्यामुळे आणि तसेच दीर्घकाळ त्याचे परिणाम जाणवत असल्याने अनेक रुग्ण दुखणाऱ्या गुडघ्यासह आयुष्य व्यतीत करायचे. परंतु गेल्या काही वर्षांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानामुळे वैद्यकीय उपचारप्रणालींमध्ये क्रांतिकारक बदल झाले आहेत. विशेषतः सध्या जगभरात चर्चेत असणाऱ्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धीमत्तेमुळे आणि त्याआधारे कार्य करणाऱ्या रोबोटस्‌मुळे रोगनिदानांपासून अवघड व गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियांमध्ये थक्क करणारे परिणाम दिसत आहेत. भारतामध्ये गेल्या काही वर्षांमध्ये कृत्रिम सांधेरोपणामध्ये रोबोटिक नी रिप्लेसमेंट सर्जरी करुन घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे.




रोबोटिक शस्त्रक्रियेमध्ये शरीरावर कमीतकमी आणि अचूकपणाने काप घेतला जातो. यामुळे आसपासच्या ऊतींना कमी नुकसान होते. याशिवाय शरीरावरील चट्टेही कमी दिसतात आणि जखमाही लवकर बऱ्या होतात. रोबोटिक सिस्टीमच्या वापरामुळे ऑपरेशन आधी कॉम्प्युटरवर त्याची रचना कशी असेल हे दिसून येते. रोबोटिक आर्म सर्जनला सबमिलीमीटर अचूकतेसह नियोजन करण्यास मदत करतो. यामुळे मानवी चुकांचा धोका कमी होतो. या पद्धतीमुळे ऑपरेशन १०० टक्के यशस्वी होण्याची आणि रुग्ण लवकर बरा होण्याची शक्यता वाढलेली आहे.

यासंदर्भात करण्यात आलेल्या अनेक अभ्यासातून आणि व्यक्तिशः मी केलेल्या शस्त्रक्रियांमधून असे दिसून आले आहे की रोबोटीक हॅंडच्या साहाय्याने केलेल्या गुडघेबदल शस्त्रक्रियेमध्ये रुग्णांचे रुग्णालयात दाखल होण्याचे कमी दिवस होतात. तसेच वेदनाही कमी होतात. त्यामुळे व्यस्त जीवनशैली असणाऱ्या रुग्णांसाठी तसेच वेदना सहन करण्याची क्षमता कमी असणाऱ्यांसाठी ही शस्त्रक्रिया वरदान ठरत आहे. अशा व्यक्ती अवघ्या काही दिवसांमध्ये कामावर परतू शकतात. काही रुग्णांमध्ये दोन्हीही गुडघ्यांची झीज झालेली असते. अशा वेळी ते एकदमच बदलणे फायदेशीर ठरते. कारण यामुळे जंतूसंसर्गाचा धोका कमी होतो. तसेच शस्त्रक्रियेसाठीचा खर्च तुलनेने कमी होतो.

रोबोटिक नी रिप्लेसमेंटची शस्त्रक्रिया करताना गुडघेदुखीची तीव्रता आणि ते दुखणे किती जुने आहे, या गोष्टी तपासल्या जातात. कृत्रिम गुडघारोपणाची शस्त्रक्रिया झाल्यावर दोन-तीन दिवसात रुग्ण चालू शकतो. त्याला टप्प्याटप्प्याने फिजिओथेरपीचे व्यायामही सांगितले जातात. या शस्त्रक्रियेनंतर चालणे-फिरणे, वाहन चालवणे, जिने चढणे-उतरणे, मांडी घालून बसणे या हालचाली करताना व्यक्तीला काहीही अडचण येत नाही. दुखण्यामुळे जे रुग्ण चालूही शकत नाहीत, त्यांचे रोजचे जीवन नक्कीच सुकर होते. अर्थात शस्त्रक्रियेनंतर वृद्ध लोकांनी घरी आणि बाथरूममध्ये पडण्याच्या धोक्यापासून स्वतःचे संरक्षण करणे गरजेचे आहे. यासाठी रात्रीच्या वेळी घरात पुरेशी प्रकाश व्यवस्था ठेवावी. शस्त्रक्रियेनंतर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच व्यायाम करावा.

– डॉ. सुहास शहा
(लेखक प्रख्यात अस्थिरोगतज्ज्ञ आहेत.)
संपर्क : ९३२२२३५०४२ ♦♦♦

## आठ कोटी वर्षांपूर्वीचा जलचर



अमेरिकेत टेक्सासमध्ये तब्बल ८ कोटी वर्षांपूर्वीच्या एका जलचर प्राण्याचे जीवाश्म सापडले आहे. या प्राण्याचा जबडा मशरुमसारख्या दिसणाऱ्या मजबूत दातांनी भरलेला होता. हा दुर्मीळ मोसासॉर प्राणी वीस फूट लांबीपर्यंतही वाढू शकत असावा, असे संशोधकांनी म्हटले आहे.

संशोधकांना अशा प्राण्यांचे दोन जबडे सापडले आहेत. या प्राण्यांना 'ग्लोबिडेन्स अलाबामेन्सिस' असे वैज्ञानिक नाव आहे. त्यांच्या जबड्यात गोलाकार दातांची रांग आहे. हे प्राणी आपल्या भक्ष्याला कसे मजबुतीने पकडत असत हे त्यावरून दिसून येते.

हिल्सबोरोमधील 'टेक्सास थ्रु टाईम' जीवाश्म संग्रहालयातील मरीन पॅलिओंटोलॉजिस्ट बेथानी बर्क फ्रॅंकलिन यांनी सांगितले की, या प्राण्यांचे मशरुमसारखे दिसणारे दात भक्ष्यावर हल्ला करून त्याची शिकार करण्यासाठी उपयुक्त ठरत होते. तसेच शंख-शिंपल्यांसारखे कठीण आवरण फोडण्यासाठीही ते उपयुक्त होते. १००.५ दशलक्ष ते ६६ दशलक्ष वर्षांपूर्वीच्या क्रेटाशियस काळातील अखेरच्या टप्प्यात असे अनेक वैशिष्ट्यपूर्ण सागरी जीव अस्तित्वात होते. त्यामध्ये डॉल्फिनसारख्या दिसणाऱ्या इचथायोसॉर्स आणि लांब मानेच्या प्लेसिओसॉर्सचा समावेश होतो.


मात्र, बदलते हवामान आणि सागरी इकोसिस्टीममधील बदलाचे ते बळी ठरले. मोसासॉर्स हे समुद्राच्या उथळ पाण्यातील मोठे शिकारी होते.


अमेरिकेत टेक्सासमध्ये तब्बल ८ कोटी वर्षांपूर्वीच्या एका जलचर प्राण्याचे जीवाश्म सापडले आहे. या प्राण्याचा जबडा मशरुमसारख्या दिसणाऱ्या मजबूत दातांनी भरलेला होता. हा दुर्मीळ मोसासॉर प्राणी वीस फूट लांबीपर्यंतही वाढू शकत असावा, असे संशोधकांनी म्हटले आहे. संशोधकांना अशा प्राण्यांचे दोन जबडे सापडले आहेत. या प्राण्यांना 'ग्लोबिडेन्स अलाबामेन्सिस' असे वैज्ञानिक नाव आहे. त्यांच्या जबड्यात गोलाकार दातांची रांग आहे. हे प्राणी आपल्या भक्ष्याला कसे मजबुतीने पकडत असत हे त्यावरून दिसून येते.

हिल्सबोरोमधील 'टेक्सास थ्रु टाईम' जीवाश्म संग्रहालयातील मरीन पॅलिओंटोलॉजिस्ट बेथानी बर्क फ्रॅंकलिन यांनी सांगितले की, या प्राण्यांचे मशरुमसारखे दिसणारे दात भक्ष्यावर हल्ला करून त्याची शिकार करण्यासाठी उपयुक्त ठरत होते. तसेच शंख-शिंपल्यांसारखे कठीण आवरण फोडण्यासाठीही ते उपयुक्त होते. १००.५ दशलक्ष ते ६६ दशलक्ष वर्षांपूर्वीच्या क्रेटाशियस काळातील अखेरच्या टप्प्यात असे अनेक वैशिष्ट्यपूर्ण सागरी जीव अस्तित्वात होते. त्यामध्ये डॉल्फिनसारख्या दिसणाऱ्या इचथायोसॉर्स आणि लांब मानेच्या प्लेसिओसॉर्सचा समावेश होतो. मात्र, बदलते हवामान आणि सागरी इकोसिस्टीममधील बदलाचे ते बळी ठरले. मोसासॉर्स हे समुद्राच्या उथळ पाण्यातील मोठे शिकारी होते. ♦♦♦

## उफ् ही पाठदुखी


*सध्याच्या काळात अनेक लोकांमध्ये पाठदुखीची समस्या वाढत आहे. जड ओझे उचलणे, सतत खाली वाकणे, जड वस्तू अयोग्य पद्धतीने उचलणे, सांधेदुखी, हाडे ठिसूळ होणे, मणक्याला मार बसणे, व्यायाम न करणे ही कारणे तुमची पाठदुखी वाढवतात. मात्र या कारणांपेक्षाही आणखी एक कारण असे आहे, ज्यामुळे तुमची पाठदुखीचे प्रमाण वाढू शकते. सध्या अनेकांना कार्यालयातील खुर्चीत तासन्तास एकाच स्थितीत बसण्याची सवय पाठदुखीस कारणीभूत ठरते. प्रत्येक वयोगटातील व्यक्तींना पाठदुखीची समस्या सतावते. हे दुखणे तुमच्या दैनंदिन जीवनशैलीवर नकारात्मक परिणाम करते. तीव्र पाठदुखी शारीरिक, मानसिक आणि भावनिकदृष्ट्या थकवा आणणारी असू शकते. ज्यामुळे तुम्हाला थकवा जाणवू शकतो. म्हणून पाठदुखीकडे दुर्लक्ष करणे घातक ठरू शकते, असे तज्ज्ञ सांगतात. पाठदुखीची काही कारणे व उपाय पुढीलप्रमाणे...*





**धूम्रपान :** धूम्रपानाच्या सवयी मणक्याच्या आरोग्यास हानी पोहोचवू शकतात. यामुळे मणक्यातील डिस्कचे नुकसान होऊन त्याची झीज होते. निकोटीन, सिगारेटमध्ये असलेले हानिकारक द्रव्य मणक्यातील रक्त प्रवाहात अडथळा आणतात, ज्यामुळे वेदना आणि अस्वस्थता वाटू लागते.

**दुखापत :** पाठीच्या दुखापती जसे की पाठीवर येणारा अतिरिक्त ताण, अचानक दुखापत होणे तसेच फ्रॅक्चरमुळे मणक्याचे आरोग्य बिघडू शकते. अपघात, घसरून पडणे, जड वजन उचलणे आणि जास्त प्रमाणात शारीरिक व्यायाम केल्याने पाठीच्या दुखापती होऊ शकतात. या दुखापतींकडे किरकोळ वेदना म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले जाते.




**सायटिका :** ही एक अशी स्थिती आहे, जी सायटिक नर्व्हच्या मार्गावर पसरते, जी पाठीच्या खालच्या भागातून, नितंब आणि पायातून खाली जाते. यामुळे तुमच्या कंबरेपासून ते पायापर्यंत असह्य वेदना होतत. या स्थितीत कंबरेपासून पायाच्या मागच्या भागातून खाली पसरणारी तीक्ष्ण वेदना होतात.

**तणाव :** झोपेचा अभाव, नैराश्य किंवा चिंता यामुळेही पाठीच्या वेदना होतात.

**लठ्ठपणा :** लठ्ठपणाचा त्रास असलेले लोक अनेकदा पाठदुखीची तक्रार करताना दिसतात. जास्त वजनामुळे मणक्यावर, विशेषतः पाठीच्या खालच्या भागावर अतिरिक्त ताण येतो. दुर्लक्ष केल्यास दैनंदिन कामात अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

**स्लीप डिस्क :** पाठीचा मणका हा २६ हाडांनी बनलेला असतो. प्रत्येक हाडांमध्ये मऊ चकती असते. ही चकती दोन भागात असते. चकतीचा आतला भाग मऊ, मांसल असतो तर बाहेरचे कवच कठीण असते. कोणतीही जखम किंवा आजारपण यामुळे चकतीचा मऊ भाग कठीण कवचाच्या बाहेर ढकलला जातो. यालाच स्लिप डिस्क म्हणतात. यामुळे गंभीर पाठदुखी होते.




**ॲंकिलोझिंग स्पॉन्डिलायटिस:** हा एक प्रकारचा संधिवात आहे, जो पाठीच्या कण्यावर दुष्परिणाम करतो, ज्यामुळे मणक्यामध्ये जळजळ होते. यामुळे एखाद्याला पाठदुखीची समस्या सतावू शकते.

### पाठदुखी कशी टाळाल?

- चालताना किंवा बसताना, पाठ सरळ ठेवा, यामुळे तुमचा पाठीचा कणा ताठ राहतो. वाकून बसल्याने पाठदुखीची समस्या निर्माण होत असते. विशेषतः ऑफिसमध्ये जास्त वेळ घालवत असलेल्या व्यक्तींनी बसताना पाठ नेहमी सरळ ठेवली पाहिजे.
- जास्त प्रमाणात पाठदुखी होत असेल तर नियमित योगासने करा, त्यामुळे स्नायूंची क्षमता वाढते आणि पाठीचा कणा लवचिक बनतो.
- मणक्याचे आरोग्य चांगले राखण्यासाठी दररोज किमान ५ मिनिटे स्ट्रेचिंग करा.
- जर तुम्ही जास्त वेळ एकाच ठिकाणी बसत असाल तर एक किंवा दोन तासांनंतर वारंवार ब्रेक घ्या. तुमच्या पाठीला आधार देण्यासाठी तुम्ही कुशन्सचा वापर करू शकता.
- हाडे मजबूत ठेवण्यासाठी जीवनसत्त्वे, खनिजे, अँटिऑक्सिडंटस, लोह, जस्त, प्रथिने आणि कार्बोहायड्रेटस्? यासारख्या आवश्यक पोषक घटकांचा समावेश निरोगी आणि पोषक आहार घ्या. दुखापतीमुळे किंवा स्पॉन्डिलायटिसमुळे पाठदुखी झाल्यास, पाठदुखीचे व्यवस्थापन करण्यासाठी औषधे, फिजिओथेरेपी, शस्त्रक्रिया करण्याची गरज भासू शकते. ♦♦♦



अहिल्यानगर शहर जिल्हा दंत वैद्यकीय शाखेची कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी डॉ.मुस्कान तलरेजा तर सचिवपदी डॉ.नेहा जाजू यांची फेरनिवड करण्यात आली.

# अहिल्यानगर शहर जिल्हा दंत वैद्यकीय शाखेच्या अध्यक्षपदी डॉ.मुस्कान तलरेजा तर डॉ.नेहा जाजूसचिव

नगर - अहिल्यानगर शहर जिल्हा दंत वैद्यकीय शाखेची कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. यामध्ये अहिल्यानगर शाखेच्या अध्यक्षपदी डॉ.मुस्कान तलरेजा, तर सचिवपदी पुन्हा एकदा डॉ.नेहा जाजू यांची फेरनिवड करण्यात आली.



नूतन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे उपाध्यक्षा डॉ.सोनिया औटी व डॉ.पायल धूत, सहसचिव डॉ.पल्लवी चेडे, डॉ. रुपल माचवे, खजिनदार डॉ.प्रिया भालसिंग, सीडीएच डॉ. निखिल बोमले, सीडीई डॉ.दिपाली काशिद, एक्झिक्युटीव्ह मेंबर डॉ.दिपाली गव्हाणे, डॉ.वंदना जगताप, डॉ.संजीवनी जरे, डॉ.अशलेशा सोनवणे, डॉ.पुर्वा ढाकेफळकर, डॉ.प्रज्ञा कराळे, डॉ.शिल्पा इनमुलवार, स्टेट ईसी मेंबर डॉ.मुस्कान तलरेजा, डॉ.नेहा जाजू, डॉ.हुजेफा बोहरी, डॉ.मंगेश जाधव, डॉ.मनिषा कुलकर्णी, डॉ. सुमित नलावडे, वुमन डेंटल कॉन्सिल डॉ.राजलक्ष्मी राय, डॉ.राजश्री वर्मा, स्टुडंट रिप्रेझेंटीव्ह प्रिती थोरात, संखाला संस्कार, सोशल सिक्युरिटी डॉ.अभिजित मिसाळ, ई जर्नल एडिटर डॉ.अमृता देडगांवकर, ईसीटीएस डॉ.स्वाती चंगेडीया, आर्ट ॲण्ड क्रिव्हीटी डॉ.अक्षता हांडाळ, डॉ.प्राची पंडीत, कल्चरल डॉ.रुची अट्टल, डॉ.प्राची चुडिवाल, ॲकॅडमीक डॉ.प्राची इंगळे, डॉ.पुनम मुळे, स्पोर्टस् ॲण्ड हेल्थ डॉ.प्राजक्ता झावरे, डॉ.मयुरी शिंदे, सल्लागार - डॉ.प्राची पाटील, डॉ.ममता डुंगरवाल, डॉ.निलिमा राजहंस, डॉ.मानसी आसनानी, डॉ.वैशाली पाटील, डॉ.फातिमा शेख, डॉ.वृषाली जाधव, डॉ.सुभदा जहागिरदार, डॉ. रुपाली मगर, पुढील अध्यक्ष डॉ.ओंकार भालसिंग, मागील वर्षाचे अध्यक्ष डॉ.मनिषा कुलकर्णी आदिंची निवड करण्यात आली. नुतन पदाधिकार्यांनी पदभार स्विकारला.

याप्रसंगी नुतन अध्यक्षा डॉ.मुस्कान तलरेजा म्हणाल्या, अहिल्यानगर शहर जिल्हा दंत वैद्यकीय शाखेच्यावतीने सभासदांच्या हिताबरोबरच सामाजिक दायित्व जपत आहे. संघटनेने दंत वैद्यकीय क्षेत्रातील बदलांचा स्विकार करुन नवनवीन उपचार पद्धतीचा अवलंब केला आहे. संघटनेत महिलांना प्रतिनिधीत्व देत त्यांचा नेहमीच योग्य तो सन्मान केला. अध्यक्षा म्हणून या कार्यकारिणीच्या माध्यमातून सभासदांसाठी जास्तीत जास्त उपक्रम राबवू. त्याचप्रमाणे सामाजिक उपक्रमातून महिलांसाठी विशेष कार्य करण्याचा मानस असल्याचे डॉ.मुस्कान तलरेजा यांनी सांगितले.

सचिव डॉ.नेहा जाजू म्हणाल्या, अहिल्यानगर शाखेचे कामकाज हे उत्कृष्टपणे सुरु आहे. सभासदांच्या अडचणी सोडविण्यासाठी शाखाचा पुढाकार कौतुकास्पद आहे. एकत्रितपणे केलेल्या कार्यातून चांगले काम उभे राहत असते. शाखेने दंत वैद्यकीय क्षेत्रात होणाऱ्या बदलांची माहिती तज्ञांद्वारे सर्वांपर्यंत पोहचविण्यासाठी व्याख्याने आयोजित करुन सभासदांना त्याचा फायदा होईल, असेच कार्यक्रम संघटनेच्यावतीने घेण्यात येतील. जेणे करुन अहिल्यानगर शाखेच्या लौकिकात वाढच होईल. महिला कार्यकारिणीच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येतील, असे सांगितले.

# पुणे-नाशिक रेल्वेमार्ग शिर्डी ऐवजी संगमनेर तालुक्यातूनच नेण्यात यावा

## आमदार सत्यजीत तांबे यांनी विधानपरिषद सभागृहात मांडली भूमिका



नागपूर - पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेमार्गाच्या मूळ आराखड्यात बदल करत हा मार्ग संगमनेर तालुक्याऐवजी शिर्डीकडे वळवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे संगमनेरकरांमध्ये प्रचंड नाराजी असून आमदार सत्यजीत तांबे यांनी याच असंतोषाला हिवाळी अधिवेशनादरम्यान सभागृहात वाचा फोडली आहे. या मार्गाच्या मूळ आराखड्यानुसार तो संगमनेर तालुक्यातून जाणं अपेक्षित असताना रेल्वेमार्गाच्या मूळ आराखड्यात कोणताही बदल न करता तो संगमनेरमधूनच नेण्यात यावा, अशी आग्रही मागणी आ. सत्यजीत तांबे यांनी केली आहे.

राज्य सरकारने महारेलच्या माध्यमातून सिन्नर व संगमनेर तालुक्यात भूसंपादनही केले आहे. असे असताना अचानक या मार्गात बदल करत तो संगमनेरऐवजी राजगुरूनगरवरून थेट शिर्डीकडे वळवण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे आ. तांबे म्हणाले.

पुणे-नाशिक या दोन महानगरांना जोडणारा रेल्वेमार्ग महारेलच्या माध्यमातून उभारण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. या रेल्वेमार्गामुळे पुण्यातील चाकण, भोसरी आणि नाशिक जिल्ह्यातील सिन्नर आणि मुसळगाव या चार औद्योगिक वसाहती जोडल्या जाणार आहेत. त्यामुळे संगमनेर तालुक्यातील तरुणांना रोजगाराच्या संधी अधिक प्रमाणात उपलब्ध होण्याची शक्यता होती.

या निर्णयामुळे संगमनेरकरांचे मोठे नुकसान होणार असून जनतेत प्रचंड रोषाचे वातावरण तयार झाले आहे. शिर्डीकडे जाणाऱ्या अनेक रेल्वेगाड्या याआधीच धावत आहेत. नाशिक-शिर्डी एकमेकांशी जोडलेले आहेत. मात्र संगमनेर अद्याप रेल्वेच्या नकाशावर नाही. त्यामुळे आमच्या भागासाठी हा महत्त्वाचा रेल्वेमार्ग आहे. परिणामी राज्य सरकारने मूळ आराखड्यात बदल न करता हा मार्ग संगमनेरवरूनच न्यावा, अशी मागणी आ. तांबे यांनी केली आहे.

### रेल्वेमंत्र्यांची घेतली होती भेट

नाशिक-पुणे सेमी-हायस्पीड रेल्वे प्रकल्पाला विलंब होत आहे. प्रकल्पाची अंमलबजावणी कोणी करायची अशी मागणी भेटीत केली होती. २५ ते ३० टक्के भूसंपादन प्रक्रियादेखील पूर्ण झाली असून शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला देण्यात आला आहे. अशा वेळी प्रकल्पात बदल करणे घातक आहे. त्यामुळे महारेलसोबत प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू ठेवून पूर्वी ठरल्याप्रमाणे मूळ मार्ग कायम ठेवा. ट्रेनचा मार्ग बदलून प्रकल्पाला वळसा न घालता सरळ दिशेने नेण्याची मागणी आ. तांबेंनी केली होती.

### पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्पासाठी सगळ्यांनी संघर्ष करावा!

नाशिक-पुणे सेमी हायस्पीड रेल्वेमार्ग मूळ नियोजनानुसारच अस्तित्वात यावा, यासाठी आपण सर्वांनी एकत्र येत या विरोधात लढा दिला पाहिजे. तरच या पट्ट्यातील लाखो लोकांना या रेल्वेमार्गाचा लाभ होऊ शकेल. संगमनेर मधील सर्व जनतेने पुणे-नाशिक रेल्वे मार्गात बदल न करता हा मार्ग संगमनेरवरूनच न्यावा यासाठी संघर्ष करावा असे आवाहन आमदार, सत्यजीत तांबे यांनी केले आहे.

# भरधाव वेगात रिक्षा चालवणाऱ्या दोघांवर कारवाई

नगर - भरधाव वेगात रिक्षा चालवून, अपघात होऊन मानवी जीवितास धोका होईल अथवा दुखापत होण्याची शक्यता असेल इतक्या बेदरकारपणे रिक्षा चालविणाऱ्या वाहन चालकांवर कोतवाली पोलिसांनी बुधवारी (दि.१८) रात्री इम्पिरियल चौक येथे कारवाई केली.

कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार विजय काळे, तोहसीन शेख, गाडे हे शहरामध्ये पेट्रोलिंग गस्त व ट्रॅफिक केसेस करीत असताना इंपिरियल चौक येथील रोडवर रात्री सव्वा आठ वाजण्याच्या सुमारास एक पे पॅगो कंपनीची रिक्षा (क्र. एम एच १६ बी ९६५१) वरील चालक रस्त्याने जाताना बेदरकारपणे रिक्षा चालवताना मिळून आला. वहीद असिफ शेख (वय ३१, रा. मदरशाच्या पाठीमागे, आलमगीर, नागरदेवळे) असे त्याचे नाव आहे.

तर इम्पिरियल चौकात भरधाव वेगात रिक्षा चालवणाऱ्या मोहसीन हमीद खान (वय ३६, रा. संगती कंट्रक्शन, गोविंदपुरा) याच्यावरही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात पो.कॉ.तेहसीन शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २८१ प्रमाणे दोघांविरूद्ध वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.





सावेडी प्रभाग समिती कार्यालय पासून अतिक्रमण हटविण्यास सुरुवात करण्यात आली. चहा नाष्टा स्टॉल ज्यूस स्टॉल तसेच लोखंडी बोर्ड तोडण्यात आले आहे. प्रभाग अधिकारी बबनराव काळे, क्षेत्रीय अधिकारी अर्जुन जाधव, राहुल साबळे, मुख्यालय क्षेत्रीय अधिकारी रिजवान शेख यांनी अतिक्रमण पथक, वाहन व जीसीबी याद्वारे मोहीम सुरू केली. आकाशवाणी, प्रोफेसर चौक रोड लगत असणारे अतिक्रमण बोर्ड यावेळी हटविण्यात आले. (छाया - बबलू शेख)

# सौर ऊर्जेच्या जास्तीत जास्त वापरामुळे भविष्यात आपण विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होऊ

## मनपा आयुक्त यशवंत डांगे

नगर - जलविद्युत किंवा थर्मल इलेक्ट्रीसिटी माध्यमातून आपण वीज निर्मिती करत आहोत. मात्र कधितरी कोळसा संपणार आहे तर पाण्यावरची वीजनिर्मितीही अतिशय गुंतागुंतीची आहे. त्यामुळे भविष्यात आपल्याला सौर ऊर्जेच्या पर्यायांकडेच जावे लागणार आहे. त्यामुळे सौर उर्जेचा वापर अधिक वाढवण्यासाठी केली जात असलेली जनजागृती उपयुक्त ठररणार असून सौर ऊर्जेच्या जास्तीत जास्त वापरामुळे भविष्यात आपण विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होऊ. सौर उर्जा क्षेत्रात अहिल्यानगर मध्ये अतिशय उत्कृष्ट काम सुरु आहे. सौर उर्जेच्या अधिक वापरा बाबत जनजागृती करून हे काम अधिक वेगाने पुढे न्यावे, असे आवाहन अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताहानिमित्त अहिल्यानगर महावितरण मंडल कार्यालय व शहरातील सौर ऊर्जा व्यावसायिक व विद्युत कंत्राटदार यांच्या संयुक्त विद्यमाने पंतप्रधान सूर्य घर मोफत वीज योजना व सौर ऊर्जेच्या वापराबाबत नागरिकांमध्ये अधिक जागृती होण्यासाठी आयोजित जनजागृती रॅलीचे व जनजागृती वाहनाचे उद्घाटन मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते झाले. यावेळी नगर विभागाचे प्रांताधिकारी सुधीर पाटील, महावितरणचे कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण, अतिरिक्त कार्यकारी अभियंता भाऊसाहेब कुमावत, प्रभारी अधीक्षक अभियंता लक्ष्मण काकडे, ऑल इंडिया रिन्यूएबल असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष अमित काळे, विद्युत कंत्राटदार संघटनेचे राज्याचे अध्यक्ष उमेश रेखे, जिल्हाध्यक्ष दत्ता झिंजुर्डे, सचिव अर्जुन ससे, महाऊर्जेचे अप्पासाहेब ठाणगे आदींसह शहरातील सौर ऊर्जा व्यावसायिक, महावितारांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताह निमित्त सौर ऊर्जेच्या जनजागृतीसाठी काढण्यात रॅलीचे उद्घाटन करताना मनपा आयुक्त यशवंत डांगे. समवेत प्रांताधिकारी सुधीर पाटील, यावेळी महावितरणचे कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण आदींसह शहरातील सौर ऊर्जा व्यावसायिक व विद्युत कंत्राटदार

### राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताहानिमित्त सौर ऊर्जा जनजागृती रॅलीस प्रतिसाद

यावेळी सुधीर पाटील म्हणाले, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी पुढाकार घेऊन जिल्ह्यात हजारो एकर जमिनी सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी उपलब्ध करून देत महावितरणकडे वर्गीकृत केल्याने त्यांचे अभिनंदन करतो. सौर उर्जा वापराबाबत होत असलेली जनजागृती कौतुकास्पद आहे. सौर ऊर्जा ही नश्वर नाहीये. प्रदूषणमुक्ततेसाठी सौर ऊर्जेचा वापर वाढणे महत्वाचे आहे. या जनजागृती रॅलीमुळे सर्वसामान्य नागरिकांना सौर ऊर्जेचे महत्व समजणार आहे.

यावेळी महावितरणचे कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण यांनी उपस्थिताना सौर ऊर्जेच्या वापराबाबत व पर्यावरणवादी जीवनशैली बाबत प्रतिज्ञा दिली. प्रकृती रक्षति रक्षितः हा मंत्र सर्वांनी लक्षात ठेऊन आचरणात आणावा असे आवाहन केले.

राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताह निमित्त राज्यात केवळ अहिल्यानगर शहरातच रॅली काढून जनजागृती करण्यात आली. यावेळी रॅलीत सहभागी झालेल्यांनी प्राधान्याने ई बाईकच वापरून पंतप्रधान सूर्य घर मोफत वीज योजना व सौर ऊर्जेच्या वापराबाबत जनजागृती करणारे फलक हातात घेतले होते. सोलरचा वापर काळाची गरज..., सोलर वापरा वीज वाचवा... अशा घोषणा यावेळी रॅलीत देण्यात आल्या. ही रॅली सावेडी उपनगर व शहरातील काही भागांमध्ये फिरून नगर कॉलेज जवळील महावितरण मंडल कार्यालय येथे समाप्त करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अधिकारी स्वप्नील उल्हे यांनी केले. सूत्रसंचालन अमित काळे यांनी केले तर अतिरिक्त कार्यकारी अभियंता सुजाता नागराळे यांनी आभार मानले. यावेळी निलेश चिपाडे, प्रदीप करांडे, ओम काळे, भूषण बंग, नारायण शिरसाठ, विशाल होळकर, प्रणव भणगे, अजिंक्य जंजिरे, किरण बोरुडे, प्रसाद तोडमल, विशाल उणवणे, अक्षर भगत आदी उपस्थित होते.

# केडगाव बायपास चौकात टेम्पो चालकास तीन अनोळखी इसमाकडून बेदम मारहाण

नगर - भाडे घेऊन शहरात येणाऱ्या टेम्पो चालकाने त्याला अडविणाऱ्या तिघांना नवीन टोल नाका, बायपास मार्गे जाण्यास नकार दिल्याने तिघांनी टेम्पो चालकास शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी व लाकडी दांडक्याने मारहाण केली. ही घटना केडगाव बायपास चौकात स्वीट होम जवळ गुरुवारी (दि.१९ ) रात्री आठ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबतची माहिती अशी की किशोर भाऊसाहेब शेंडगे (वय ४०, रा. राहुरी खुर्द, ता. राहुरी) हा जितो कंपनीची छोटा हत्ती टेम्पो (क्र.एम एच १६ सी डी ३२७४) ला मिळेल तेथे भाडे करत असतो. गुरुवारी शेंडगे हा भाडे घेऊन चास मार्गे नगरला येत असताना केडगाव बायपास स्वीट होम जवळ रात्री आठ वाजण्याच्या सुमारास तीन अनोळखी इसमांनी त्याला हात दाखवुन थांबवले. त्यावेळी त्या अनोळखी इसमांनी आणखी काही गाड्या हात दाखवुन थांबविल्या होत्या. शेंडगे हा टेम्पो घेऊन पुढे नगरकडे निघाला असता ते तीन अनोळखी इसम त्याला म्हणाले की, तू नगर शहरातून जायचे नाही. नवीन टोलनाका बायपास मार्गे निघुन जा असे म्हणाले.

तेव्हा शेंडगे त्यांना म्हणाला की, माझे नगर शहरात भाडे द्यायचे तेव्हा मला नगर शहरात जावे लागेल. असे म्हटल्याचा त्यांना राग आल्याने त्यांनी त्याला शिवी देऊन तुला एकदा सांगितले ना केडगाव बायपास टोलनाका मार्गे जा, तु आमचे ऐकत नाही का आमचे थांब तुला बघतोच असे म्हणुन त्यांनी शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यातील दोघांनी लाकडी दांडक्याने शेंडगेंच्या डाव्या पायावर जोराने मारुन त्याला जखमी केले.

त्यामुळे शेंडगे मोठमोठ्याने ओरडला. तेव्हा ते तीन अनोळखी इसम तेथुन पळून गेले. याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी किशोर शेंडगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तीन अनोळखी इसमांविरुध्द मारहाणीच्या गुन्ह्याची नोंद केली.

# अमरधाम येथून मोपेडची चोरी

नगर - नालेगाव अमरधाम मधील मंदिरासमोर हॅण्डेल लॉक करून लावलेली होंडा कंपनीची एव्हीएटर मोपेड (क्र. एम एच १६ डी जे २२३४) कोणीतरी अज्ञात चोरट्याने हॅण्डेल लॉक तोडून चोरून नेली आहे.

याबाबत मयूर किशोर मुनोत (वय ३३, रा. विनायक रेसिडेन्सी, कानडे मळा, सारसनगर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून या फिर्यादीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# माळीवाडा बसस्थानक येथून ६५ वर्षीय वृध्द महिला बेपत्ता

नगर - येथील माळीवाडा बसस्थानकातून ६५ वर्षीय महिलेस सोलापूर येथे जाण्याकरिता तिच्या नातेवाईकांनी सोलापूर जाणाऱ्या एसटी बसमध्ये बसवून दिले. परंतु ती घरी परतली नाही. याप्रकरणी तिच्या नातेवाईकांनी तिचा माळीवाडा बसस्टॅन्ड येथे तसेच आजूबाजूच्या लोकांना नातेवाईकांना फोन करून शोध घेतला असता की अद्याप कुठेही मिळून आली नाही.

याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी वृद्ध महिलेच्या बहिणीने यांनी दिलेल्या माहितीवरून हरवल्याची नोंद केली. कोतवाली पोलीस त्यांचा शोध घेत आहे.

# केडगाव व मार्केटयार्ड मागील गावठी दारु अड्ड्यावर छापे

## ५० हजारांचा मुद्देमाल जप्त, दोघांच्या विरुद्ध गुन्हे दाखल

नगर - बेकायदेशीररित्या गावठी हातभट्टी दारूची विक्री करणाऱ्या दोन दारु अड्ड्यावर कोतवाली पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्या कडील ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई केडगाव येथील गोपाळ गल्लीतील सुलभ शौचालय पाठीमागे, आणि मार्केटयार्ड मागील कर्पे मळा येथे गुरुवारी (दि.१९) करण्यात आली.

केडगाव येथील गोपाळ गल्लीतील सुलभ शौचालयाच्या पाठीमागे भिंतीच्या आडोशाला मोकळ्या जागेत एक इसम गावठी हातभट्टीची दारू विक्री करत आहे. अशी माहिती मिळाल्याने कोतवाली पोलीस तत्काळ त्या ठिकाणी गेले असता संभाजी अशोक बनसोडे (वय ३६, हल्ली रा. राधाकृष्ण कॉलनी, अंबिका नगर केडगाव, मुळ रा.देडगाव, ता. नेवासा) हा गावठी दारूची विक्री करताना आढळून आला. त्याच्याकडे २७ हजार रुपये किमतीची २७० लीटर तयार गावठी हातभट्टी दारु मिळुन आली.

दुसऱ्या कारवाईत सुरेश गोविंद कर्पे, हा त्याचे रहाते घराजवळील पत्र्याचे शेडचे आडोशाला, कर्पे मळा, मार्केटयार्ड पाठीमागे येथे गावठी हातभट्टीची तयार दारुची विक्री करताना आढळून आला. त्याचे कडे २३ हजार रुपये किमतीची एकुण २३० लिटर गावठी हातभट्टीची दारु मिळून आली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात दोघांच्या विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले. सदरची कारवाई पो. हे.कॉ. संदीप पितळे, पो.कॉ. तानाजी पवार, दिपक रोहोकले, सुजय हिवाळे, सचिन लोळगे यांनी केली.

# बाल विकास प्रकल्प आधार नोंदणी केंद्रांचे खासगीकरण केलेले नाही

नगर - महिला व बाल विकास विभागाच्या अखत्यारित असलेल्या बाल विकास प्रकल्प कार्यालयात आधार नोंदणी केंद्रांसाठी रेलटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (भारत सरकारचा उपक्रम) या संस्थेचे फक्त मनुष्यबळ घेण्यात आले असून या केंद्रांचे खासगीकरण करण्यात आले नसल्याचा खुलासा जिल्हा कार्यक्रम अधिकारी मनोज ससे यांनी केला आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमधील लाभार्थ्यांची आधार नोंदणी जलद आणि प्रभावी करण्यासाठी २०२१ मध्ये राज्यात १ हजार ६५९ आधार नोंदणी संच उपलब्ध करून दिले आहेत. प्रत्येक जिल्ह्यात ३ संच बाल विकास प्रकल्प कार्यालयांमध्ये ठेवून महाआयटी संस्थेमार्फत आधार नोंदणीचे कामकाज सुरू करण्यात आले होते. मात्र युआयडीएआय यांनी प्रस्तावित केलेली दंडनीय आणि निलंबनाच्या कारवाईत झालेली वाढ, संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी निश्चित करून दिलेल्या ठिकाणापेक्षा वेगळ्या ठिकाणी यंत्र ठेवणे, १ हजार ६५९ पैकी १६८ आधार नोंदणी संच सुरू ठेवणे या स्वरुपाच्या अडचणी आणि कामात शिथिलता आढळल्याने शासनाने महाआयटीकडे असलेले १८ जिल्ह्यातील आधार नोंदणीचे कामकाज मे. रेलटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (भारत सरकारचा उपक्रम) मुंबई या संस्थेला मनुष्यबळामार्फत करण्याचे आदेश दिले आहेत. रेलटेल कॉर्पोरेशनच्या मनुष्यबळामार्फत पुढील दोन वर्षांपर्यंत लाभार्थ्यांची आधार नोंदणी करण्यात येणार आहे. महिला व बाल विकास विभागाच्या मालकीचे आधार नोंदणी संच वापरून आणि महिला व बालविकास विभागाच्या एनरोलमेंट एजन्सी कोड वापरूनच अंगणवाडी क्षेत्रातील लाभार्थ्यांना ही सेवा देण्यात येईल. या प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचे खाजगीकरण करण्यात आलेले नसल्याचे महिला व बालविकास विभागाने स्पष्ट केले आहे.

